योहानकृत शुभवर्त्तमान.

GOSPEL OF JOHN IN MARATHI.

British and Foreign Bible Society.
(BOMBAY AUXILIARY.

Price Three Pies.

किंमत ३ पै.

Digitized by the Internet Archive
in 2025

https://archive.org/details/gospelofjohninma0000vari

योहानकृत शुभवर्तमान

(Revised Edition)

ब्रिटिश आणि फॉरेन बैबल सोसायटी.

मुंबईची शाखा, हॉर्नबी रोड.

१९१५.

BOMBAY.

BRITISH & FOREIGN BIBLE SOCIETY.

(BOMBAY AUXILIARY.)

HORNBY ROAD.

1915

योहानकृत शुभवर्त्तमान.

१ प्रारंभीं शब्द होता, आणि शब्द देवासहित होता, आणि शब्द
देव होता. २ तोच प्रारंभीं देवासहित होता. ३ त्याच्या द्वारें
सर्व झालें, आणि जें झालें असें कांहींच त्यावांचून झालें नाहीं. ४ त्यांत
जीवन होतें, व तें जीवन मनुष्यांचा प्रकाश होतें. ५ आणि तो प्रकाश
अंधारांत प्रकाशतो तरी अंधारानें त्याला ग्रहण केलें नाहीं. ६ देवानें
पाठविलेला एक मनुष्य प्रगट झाला; त्याचें नांव योहान. ७ तो साक्षी-
करितां ह्मणजे त्या प्रकाशाविषयीं साक्ष देण्याकरितां आला, यासाठीं कीं
त्याच्या द्वारें सर्वांनीं विश्वास धरावा. ८ तो हा प्रकाश नव्हता, तर त्या
प्रकाशाविषयीं साक्ष देण्याकरितां आलेला होता. ९ जगांत येणारा जो
खरा प्रकाश प्रत्येक मनुष्याला प्रकाशित करितो तो होता. १० जगांत
तो होता, व जग त्याच्या द्वारें झालें, तरी जगानें त्याला जाणिलें नाहीं.
११ तो आपल्या स्वकीयांपाशीं आला, तरी त्याच्या स्वकीयांनीं त्याचा
अंगीकार केला नाहीं. १२ जितक्यांनीं त्याचा अंगीकार केला तितक्यांस
ह्मणजे त्याच्या नांवावर विश्वास ठेवणाऱ्यांस त्यानें देवाचीं लेंकरें होण्याचा
अधिकार दिला. १३ त्याचा जन्म रक्तापासून किंवा देहाच्या इच्छे-
पासून किंवा मनुष्याच्या इच्छेपासून नव्हे, तर देवापासून झाला. १४
शब्द देही झाला, आणि कृपा व सत्य यांनीं पूर्ण असून त्यानें आह्मांमध्यें
वस्ती केली, आणि आह्मीं त्याचें गौरव पाहिलें तें गौरव बापापासून
आलेल्या एकुलत्याचें असें होतें. १५ त्याविषयीं योहान साक्ष देतो;
आणि उच्च स्वरानें ह्मणतो कीं जो माझ्या मागून येतो तो माझ्या पुढें
झाला आहे, कारण तो माझ्या पूर्वीं होता, असा जो मीं सांगितला तो
हाच आहे. १६ कारण त्याच्या पूर्णतेंतून आह्मां सर्वांस मिळालें; होय,
कृपेवर कृपा. १७ नियमशास्त्र मोझ्याच्या द्वारें दिलें होतें; कृपा व सत्य
हीं येशूख्रिस्ताच्या द्वारें आलीं. १८ देवाला कोणीं कधीं पाहिलें नाहीं;
जो एकुलता पुत्र बापाच्या उराशीं असतो त्यानें तो प्रगट केला.

१९ अणखी जेव्हां यहुद्यांनीं यरूशलेमेहून याजक व लेवी यांस त
कोण आहेस असें योहानाला विचारावयास पाठविलें तेव्हांची त्याची
साक्ष हीच आहे. २० त्यानें पत्करिलें व नाकारिलें नाहीं; मी ख्रिस्त
नाहीं असें पत्करिलें. २१ तेव्हां त्यांनीं त्याला विचारलें, तर काय
तूं एलिया आहेस काय? तो म्हणाला, मी नाहीं. तर तूं तो प्रवक्ता
आहेस काय? त्यानें नाहीं असें उत्तर दिलें. २२ यावरून ते ह्मणाले
ज्यांनीं आह्मांस पाठविलें त्यांस आह्मीं उत्तर देतां यावें ह्मणून तूं कोण
आहेस हें सांग. तूं आपणांविषयीं काय ह्मणतोस? २३ तो ह्मणाला
यशाया प्रवक्त्यानें सांगितल्याप्रमाणें "प्रभूचा मार्ग नीट करा, असें अर
ण्यांत ओरडणाऱ्याची वाणी" मी आहें. २४ ते परूषांकडून पाठविलेले
होते. २५ त्यांनीं त्याला विचारलें कीं, जर तूं ख्रिस्त नाहींस व एलिया
नाहींस व तो प्रवक्ताही नाहींस, तर बाप्तिस्मा कां करितोस? २६ योहा
नानें त्यांस उत्तर दिलें कीं मी पाण्यानें बाप्तिस्मा करितों; ज्याला तुह्मी
जाणत नाहीं असा एक तुह्मांमध्यें उभा आहे. २७ तो माझ्या मागून
येणारा, त्याच्या वाहाणेचा बंद सोडण्यास मी योग्य नाहीं. २८ य
गोष्टी यर्देनेच्या पलीकडे बेथानींत योहान बाप्तिस्मा देत होता तेथे
झाल्या.

२९ दुसऱ्या दिवशीं त्यानें येशूला आपणाकडे येतां पाहून ह्मटलें, ह
पाहा, जगाचें पाप हरण करणारा, देवाचा कोंकरा! ३० ज्याविषयीं मी
सांगितलें कीं जो माझ्या पुढें झाला आहे, कारण तो माझ्या पूर्वी होता
असा पुरुष माझ्या मागून येत आहे, तो हाच आहे. ३१ आणि मी
त्याला जाणत नव्हतों, तरी तो इस्राएलास प्रगट व्हावा ह्मणून मी येऊन
पाण्यानें बाप्तिस्मा करितों. ३२ योहानानें अशी साक्ष दिली कीं, मी
आत्म्याला खबूतरासारिखें आकाशांतून उतरतां पाहिलें आहे; आणि तें
त्यावर राहिला. ३३ आणि मी त्याला जाणत नव्हतों, तरी ज्यानें मला
पाण्यानें बाप्तिस्मा करावयास पाठविलें त्यानें मला सांगितलें होतें कीं, ज्या
कोणावर आत्मा उतरतां व राहतां पाहशील तोच पवित्र आत्म्यानें
बाप्तिस्मा करणारा आहे. ३४ मीं पाहिलें आहे व साक्ष दिली आहे कीं
हा देवाचा पुत्र आहे.

३५ त्याच्या दुसऱ्या दिवशीं योहान आपल्या शिष्यांतील दोघांसह पुनः उभा असतां ३६ येशूला चालतां न्याहाळून पाहून ह्मणाला, हा पाहा, देवाचा कोंकरा ! ३७ ते दोघे शिष्य त्याला हें ह्मणतां ऐकून येशूच्या मागून चालले. ३८ तेव्हां येशूनें वळून त्यांस आपल्या मागून येतां पाहून ह्मटलें काय शोधितां? ते ह्मणाले, रब्बी (ह्मणजे गुरुजी), आपण कोठें राहतां ? ३९ त्यानें त्यांस ह्मटलें, या ह्मणजे पाहाल. यास्तव त्यांनीं येऊन तो कोठें राहत आहे हें पाहिलें. आणि त्या दिवशीं ते त्याच्या येथें राहिले तेव्हां सुमारें दाहावा तास होता. ४० जे दोघे योहानाचें ह्मणणें ऐकून त्याच्या मागून चालले, त्यांत शिमोन पेत्राचा भाऊ अंद्रिया हा एक होता. ४१ त्याला त्याचा स्वतःचा भाऊ शिमोन पहिल्यानें भेटला तेव्हां तो त्याला ह्मणाला, मशीहा (ह्मणजे ख्रिस्त) आह्मांस सांपडला आहे. ४२ त्यानें त्याला येशूपाशीं आणिलें; येशूनें त्याकडे पाहून ह्मटलें, तूं योहानाचा पुत्र शिमोन आहेस, तुला केफा, (ह्मणजे पेत्र) ह्मणतील.

४३ दुसऱ्या दिवशीं त्यानें गालीलांत जाण्याचा बेत केला, तेव्हां फिलिप त्याला भेटला, येशूनें त्याला ह्मटलें, माझ्या मागून ये. ४४ फिलिप तर अंद्रिया व पेत्र यांचें नगर बेथसैदा एथला होता. ४५ फिलिपाला नथनेल भेटल्यावर तो त्याला ह्मणाला, ज्याविषयीं मोश्यानें नियमशास्त्रांत लिहिलें, व प्रवक्त्यांनीं लिहिलें तो ह्मणजे योसेफाचा पुत्र येशू नासरेथकर आह्मांस सांपडला आहे. ४६ नथनेलानें त्याला ह्मटलें नासरेथांतून कांहीं उत्तम निघेल काय? फिलिप त्याला ह्मणाला, येऊन पाहा. ४७ येशूनें नथनेलाला आपणाकडे येतां पाहून त्याविषयीं ह्मटलें, पाहा, हा खरोखर इस्राएली आहे, यांत कपट नाहीं. ४८ नथनेल त्याला ह्मणाला, आपणाला माझी ओळख कोठली ? येशूनें त्याला उत्तर दिलें कीं, तुला फिलिपानें बोलाविल्यापूर्वी तूं अंजिराच्या झाडाखालीं होतास तेव्हां मीं तुला पाहिलें. ४९ नथनेलानें त्याला ह्मटलें, गुरुजी, तूं देवाचा पुत्र आहेस; तूं इस्राएलाचा राजा आहेस. ५० येशूनें त्याला ह्मटलें मीं तुला अंजिराच्या झाडाखालीं पाहिलें असें तुला सांगितलें ह्मणून तूं विश्वास धरितोस काय ? यांहून मोठ्या गोष्टी पाहशील. ५१ अणखी तो त्याला ह्मणाला, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, आकाश उघडलेलें आणि देवाच्या दूतांस चढतां व मनुष्याच्या पुत्रावर उतरतां पाहाल.

२ नंतर तिसऱ्या दिवशीं गालीलांतील काना येथें लग्न होतें, आणि येशूची आई तेथें होती. २ येशूला व त्याच्या शिष्यांलाही लग्नाचें आमंत्रण होतें. ३ द्राक्षारस जेव्हां सरला तेव्हां येशूची आई त्याला ह्मणाली, त्यांच्या जवळ द्राक्षारस नाहीं. ४ येशूनें तिला ह्मटलें, बाई, माझा तुझा काय संबंध? माझी घटका अजून आली नाहीं. ५ त्याच्या आईनें चाकरांस ह्मटलें, तो जें कांहीं तुह्मांस सांगेल तें करा. ६ तेथें पाण्याच्या साहा दगडी कुंड्या यहुद्यांच्या शुद्धीकरणाच्या रीतीप्रमाणें ठेविल्या होत्या, त्या दोन दोन किंवा तीन तीन मण मावतील अशा होत्या. ७ येशूनें त्यांस ह्मटलें, कुंड्या पाण्यानें भरा. तेव्हां त्यांनीं त्या तोंडोतोंड भरल्या. ८ मग त्यानें त्यांस सांगितलें, आतां त्यांतून काढून जेवणकारभाऱ्याकडे न्या. तेव्हां त्यांनीं तें नेलें. ९ जेव्हां जेवणकारभाऱ्यानें पाण्याचा झालेला द्राक्षारस चाखला, (तो कोठला आहे हें त्याला ठाऊक नव्हतें, पाणी काढणाऱ्या चाकरांस ठाऊक होतें), तेव्हां जेवणकारभाऱ्यानें नवऱ्याला बोलावून ह्मटलें, १० प्रत्येक मनुष्य पहिल्यानें चांगला द्राक्षारस वाढतो, आणि लोक यथेच्छ प्याल्यावर मग नीट वाढितो, तूं तर चांगला द्राक्षारस अजूनपर्यंत ठेविला आहे. ११ येशूनें हा आपल्या अद्भुत कृत्याचा प्रारंभ गालीलांतील काना येथें केला, आणि आपलें गौरव प्रगट केलें, व त्याच्या शिष्यांनीं त्यावर विश्वास ठेविला.

१२ त्यानंतर तो व त्याची आई व त्याचे भाऊ व त्याचे शिष्य कफर्नहूमास खालीं गेले, परंतु तेथें ते फार दिवस राहिले नाहींत.

१३ तेव्हां यहुद्यांचा वल्हांडण सण जवळ आला, व येशू यरूशलेमेवर गेला. १४ आणि देवळांत गुरें व मेंढरें व खबुत्रें विकणारे व सराफ हे बसलेले त्याला आढळले. १५ तेव्हां त्यानें दोऱ्यांचा कोरडा करून मेंढरें व गुरें या सर्वांस देवळांतून घालविलें, सराफांचा खुर्दाही ओतिला व चौरंग पालथे केले; १६ आणि खबुत्रें विकणाऱ्यांस ह्मटलें, हीं येथून काढा; माझ्या बापाचें घर व्यापाराचें घर करूं नका. १७ तेव्हां "तुझ्या घराचा आवेश मला खाऊन टाकील" असें लिहिलें आहे हें त्याच्या शिष्यांस आठवलें. १८ यहुद्यांनीं त्याला ह्मटलें कीं, तूं हें करितोस, आह्मांस काय चिन्ह दाखवितोस? १९ येशूनें त्यांस उत्तर दिलें

तुह्मी हें देऊळ मोडा, आणि तें मी तीन दिवसांत उभारीन. २० यावरून यहूदी ह्मणाले, हें देऊळ बांधावयास शेचाळीस वर्षें लागलीं, आणि तें तीन दिवसांत तूं उभारिशील काय ? २१ तो तर स्वशरीररूप देवळाविषयीं बोलला. २२ यास्तव तो मेलेल्यांमधून उठल्यावर त्याच्या शिष्यांस, त्यानें असें ह्मटलें होतें, हें आठवलें, आणि त्यांनीं शास्त्रावर व येशूनें जें वचन सांगितलें होतें त्यावर विश्वास ठेविला.

२३ तो वल्हांडणाच्या सणांत यरूशलेमेंत असतांना त्यानें केलेलीं अद्भुत कृत्यें पाहून लोकांनीं त्याच्या नांवावर विश्वास ठेविला. २४ येशूनें तर सर्वांस ओळखल्यामुळें आपणाला त्यांस सोंपलें नाहीं, २५ आणखी मनुष्याविषयीं कोणीं साक्ष द्यावी याची त्याला गरज नव्हती; कारण मनुष्यांत काय आहे हें स्वतः त्याला ठाऊक होतें.

३ परूषांपैकीं निकदेम नामक मनुष्य होता. तो यहुद्यांचा एक अधिकारी होता. २ तो रात्रीं त्याकडे येऊन त्याला ह्मणाला, गुरुजी, तूं देवापासून आलेला गुरु आहेस हें आह्मांस ठाऊक आहे, कारण हीं जीं अद्भुत कृत्यें तूं करितोस तीं देव बरोबर असल्यावांचून कोणाच्यानें करवणार नाहींत. ३ येशूनें त्याला ह्मटलें कीं, मी तुला खचीत खचीत सांगतों, नव्यानें जन्मल्यावांचून कोणाच्यानें देवाचें राज्य पाहवत नाहीं. ४ निकदेम त्याला ह्मणाला, मनुष्य ह्मातारा असतां कसा जन्मेल ! त्याच्यानें दुसऱ्यानें मातेच्या उदरांत जाववेल व जन्मवेल काय ? ५ येशूनें उत्तर दिलें कीं, मी तुला खचीत खचीत सांगतों, पाण्यापासून व आत्म्यापासून जन्मल्यावांचून कोणाच्यानें देवाच्या राज्यांत प्रवेश करवत नाहीं. ६ जें देहापासून जन्मलें तें देह आहे, आणि जें आत्म्यापासून जन्मलें तें आत्मा आहे. ७ तुह्मांस नव्यानें जन्मलें पाहिजे हें मीं तुला सांगितलें, ह्मणून आश्चर्य मानूं नको. ८ वारा पाहिजे तिकडे वाहतो, आणि त्याचा शब्द तूं ऐकतोस, तरी तो कोठून येतो व कोठें जातो हें तुला कळत नाहीं; जो कोणी आत्म्यापासून जन्मला तो तसाच आहे. ९ निकदेमानें त्याला ह्मटलें, या गोष्टी कशा होतील ? १० येशूनें त्याला उत्तर दिलें कीं, तूं इस्राएल लोकांचा गुरु असून या गोष्टी समजत नाहींस काय ? ११ मी तुला खचीत खचीत सांगतों कीं, जें आह्मांस ठाऊक

आहे तें आह्मी सांगतों, आणि जें आह्मीं पाहिलें आहे त्याविषयीं साक्ष देतों, आणि तुह्मी आमची साक्ष मान्य करीत नाहीं. १२ मीं पृथ्वीवरच्या गोष्टी तुह्मांस सांगितल्या आणि तुह्मी विश्वास धरीत नाहीं, मग स्वर्गांतल्या गोष्टी तुह्मांस सांगितल्यास विश्वास कसा धराल? १३ स्वर्गाहून उतरलेला जो मनुष्याचा पुत्र यावांचून कोणी स्वर्गावर चढला नाहीं. १४ आणि जसा मोश्यानें अरण्यांत सर्प उंच केला तसेंच मनुष्याच्या पुत्राला उंच केलें पाहिजे; १५ यासाठीं कीं जो कोणी विश्वास ठेवितो त्याला त्याच्या ठायीं सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें.

१६ देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं, त्यानें आपला एकुलता पुत्र दिला, यासाठीं कीं जो कोणी त्यावर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊं नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें. १७ देवानें पुत्राला जगाचा न्याय करण्यासाठीं नाहीं तर त्याच्या द्वारें जगाचें तारण व्हावें म्हणून पाठविलें. १८ जो त्यावर विश्वास ठेवितो त्यावर न्यायाचा प्रसंग येत नाहीं; जो विश्वास ठेवीत नाहीं त्याचा न्याय झालाच आहे, कारण त्यानें देवाच्या एकुलत्या पुत्राच्या नांवावर विश्वास ठेविला नाहीं. १९ आणि तो न्याय हाच आहे कीं जगांत प्रकाश आला आहे, आणि मनुष्यांनीं प्रकाशापेक्षां अंधाराची आवड धरिली; कारण त्यांचीं कर्मे दुष्ट होतीं. २० जो कोणी वाईट कर्मे करितो तो प्रकाशाचा द्वेष करितो, आणि आपल्या कर्मांचा दोष ठरूं नये ह्मणून प्रकाशाकडे येत नाहीं. २१ परंतु जो सत्य आचरितो तो प्रकाशाकडे येतो; यासाठीं कीं त्याचीं कर्मे अशीं उघड व्हावीं कीं तीं देवाच्या ठायीं केलेलीं आहेत.

२२ त्यानंतर येशू आणि त्याचे शिष्य यहूदीया देशांत आले; आणि तो तेथें त्यांच्या संगतीं राहून बाप्तिस्मा करी. २३ आणि योहानही शालीमाजवळचें एनोन येथें बाप्तिस्मा करीत असे, कारण तेथें बहुत पाणी होतें, आणि लोक येऊन बाप्तिस्मा घेत असत. २४ योहान अद्यापि बंदिशाळेंत पडला नव्हता. २५ योहानाच्या शिष्यांचा एका यहुद्याशीं शुद्धीकरणाविषयीं वादविवाद झाला. २६ आणि ते योहानाकडे येऊन त्याला ह्मणाले, गुरुजी, पाहा, यर्देनेच्या पलीकडे जो तुझ्या संगतीं होता, ज्याविषयीं तूं साक्ष दिली आहे, तो बाप्तिस्मा करितो, आणि सर्व लोक

त्याकडे जातात. २७ योहानानें उत्तर दिलें कीं, मनुष्याला स्वर्गांतून दिल्यावांचून कांहीं मिळत नाहीं. २८ मी ख्रिस्त नव्हें, तर त्याच्यापुढें पाठविलेला आहें, असें मीं म्हटलें, याविषयीं तुम्हीच माझे साक्षी आहां. २९ ज्याला वधू आहे तो वर; आणि वराचा मित्र जो उभा राहून त्याचें भाषण ऐकतो तो वराच्या शब्दावरून अति आनंद पावतो; तर हा माझा आनंद पूर्ण झाला आहे. ३० त्याची वृद्धी व्हावी व माझा ऱ्हास व्हावा हें अवश्य आहे.

३१ वरून येणारा तो सर्वांच्या वर आहे; जो पृथ्वीपासून झाला तो पृथ्वीचा आहे व पृथ्वीच्या गोष्टी बोलतो; जो स्वर्गांतून आला तो सर्वांच्या वर आहे. ३२ जें त्यानें पाहिलें व ऐकिलें आहे त्याविषयीं तो साक्ष देतो, आणि त्याची साक्ष कोणी कबूल करीत नाहीं. ३३ ज्यानें त्याची साक्ष कबूल केली आहे त्यानें देव सत्य आहे या गोष्टीवर शिक्का केला आहे. ३४ ज्याला देवानें पाठविलें तो देवाचीं वचनें बोलतो, कारण तो आत्मा परिमित देत नाहीं. ३५ बाप पुत्रावर प्रीति करितो, आणि त्यानें सर्व त्याच्या हातीं दिलें आहे. ३६ जो पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन आहे; परंतु जो पुत्राला मानीत नाहीं तो जीवन पाहणार नाहीं, तर देवाचा क्रोध त्यावर राहतो.

४ येशू योहानापेक्षां अधिक शिष्य करून त्यांचा बाप्तिस्मा करीत आहे असें परूशांनीं ऐकिलें हें जेव्हां प्रभूला कळलें, २ (तरी येशू स्वतां बाप्तिस्मा करीत नसे, त्याचे शिष्य करीत असत,) ३ तेव्हां तो यहूदीया सोडून पुनः गालीलांत गेला. ४ आणि त्याला शोमरोनामधून जावें लागलें. ५ तेव्हां तो शोमरोनांतील सूखार नामें नगरास आला, तें याकोबानें आपला पुत्र योसेफ यास दिलेल्या शेतापाशीं होतें. ६ तेथें याकोबाचा झरा होता; येशू चालतां चालतां दमलेला तसाच त्या झऱ्यावर बसला. तेव्हां सुमारें साहावा तास होता. ७ तेथें शोमरोनची एक स्त्री पाणी काढावयास आली; तिला येशू म्हणाला, मला प्यायाला दे; ८ कारण त्याचे शिष्य अन्न विकत घ्यायास नगरांत गेले होते. ९ तेव्हां ती शोमरोनी स्त्री त्याला म्हणाली, तूं यहूदी असतां मज शोमरोनी स्त्रीपासून प्यायाला कसें मागतोस ? (कारण यहूदी शोमरोन्यांशीं वहि-

वाट ठेवीत नाहींत.) १० येशूनें तिला उत्तर दिलें कीं, देवाचें दान तुला कळलें असतें आणि मला प्यायाला दे असें तुला म्हणणारा कोण आहे, हें तुला कळलें असतें तर तूं त्यापाशीं मागितलें असतें आणि त्यानें तुला जीवंत पाणी दिलें असतें. ११ ती त्याला म्हणाली, महाराज, पाणी काढावयास तुझ्यापाशीं पोहरा नाहीं व विहीर खोल आहे, तर तें जीवंत पाणी तुजपाशीं कोठलें ? १२ आमचा पूर्वज याकोब यानें ही विहीर आम्हांस दिली, तो स्वतां व त्याचे पुत्र व त्याचीं गुरेंढोरें हिचें पाणी पीत असत; त्यापेक्षां तूं मोठा आहेस काय ? १३ येशूनें तिला उत्तर दिलें, जो कोणी हें पाणी पिईल त्याला पुनः तहान लागेल; १४ परंतु जें पाणी मी देईन तें जो कोणी पिईल त्याला कधीं तहान लागणार नाहीं; तर जें पाणी मी त्याला देईन तें त्यामध्यें सार्वकालिक जीवनासाठीं उफळत्या पाण्याचा झरा असें होईल. १५ स्त्री त्याला म्हणाली, महाराज, मला तहान न लागावी व मी पाणी काढावयास एथवर न यावें म्हणून तें पाणी मला दे. १६ तो तिला ह्मणाला, जाऊन आपल्या नवऱ्याला बोलाव आणि इकडे ये. १७ स्त्री म्हणाली, मला नवरा नाहीं. येशूनें तिला म्हटलें, मला नवरा नाहीं हें ठीक बोललीस, १८ कारण तुला पांच नवरे होते; आणि आतां जो तुला आहे तो तुझा नवरा नाहीं, हें तूं खरें म्हटलेंस. १९ स्त्री त्याला ह्मणाली, महाराज, तूं प्रवक्ता आहेस हें मला आतां समजलें. २० आमच्या पूर्वजांनीं याच डोंगरावर उपासना केली, आणि तुम्ही म्हणतां उपासना ज्या स्थानीं केली पाहिजे तें स्थान यरूशलेमेंत आहे. २१ येशूनें तिला म्हटलें, बाई, तुम्ही बापाची उपासना या डोंगरावर व यरूशलेमेंतही करणार नाहीं अशी वेळ येत आहे. २२ तुम्हांस ठाऊक नाहीं अशाची उपासना तुम्ही करितां; आम्हांस ठाऊक आहे अशाची उपासना आम्ही करितों; कारण यहूद्यांतूनच तारण आहे. २३ तरी खरे उपासक आत्म्यानें व खरेपणानें बापाची उपासना करितील अशी वेळ येत आहे किंबहुना आलीच आहे, कारण असे आपले उपासक असावे अशी बापाची इच्छाही आहे. २४ देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनीं त्याची उपासना आत्म्यानें व खरेपणानें केली पाहिजे. २५ स्त्री त्याला म्हणाली, मशीहा (म्हणजे ख्रिस्त) तो

येणार आहे हें मला ठाऊक आहे, तो आल्यावर आम्हांस सर्व गोष्टी सांगेल. २६ येशूनें तिला म्हटलें, जो तुझ्याशीं बोलत आहे तो मी तोच आहें.

२७ इतक्यांत त्याचे शिष्य आले; आणि तो एका स्त्रीशीं बोलत आहे याचें त्यांस आश्चर्य वाटलें, तरी तूं काय विचारितोस किंवा तिजशीं कां बोलतोस, असें कोणीं म्हटलें नाहीं. २८ स्त्री तर आपली घागर टाकून नगरांत जाऊन लोकांस म्हणूं लागली, २९ चला, मीं केलेलें सर्व ज्यानें मला सांगितलें त्या मनुष्याला पाहा, तोच ख्रिस्त असेल काय? ३० ते नगरांतून निघून त्याकडे येऊं लागले. ३१ या अवकाशांत शिष्यांनीं त्याला विनंती केली कीं, गुरुजी, जेवा. ३२ परंतु तो त्यांस म्हणाला, तुम्हांस ठाऊक नाहीं असें अन्न खायला मजजवळ आहे. ३३ यावरून शिष्य एकमेकांस म्हणाले, याला कोणीं खायला आणिलें असेल काय ? ३४ येशू त्यांस म्हणाला ज्यानें मला पाठविलें त्याच्या इच्छेप्रमाणें करावें व त्याचें कार्य सिद्धीस न्यावें हेंच माझें अन्न आहे. ३५ चार महिन्यांचा अवकाश आहे मग कापणी येईल असें तुह्मी ह्मणतां कीं नाहीं ? पाहा मी तुह्मांस ह्मणतों, आपले डोळे वर करून शेतें पाहा, कीं तीं कापणीसाठीं पांढरीं होऊन चुकलीं आहेत. ३६ कापणारा मजुरी पावत आहे व सार्वकालिक जीवनासाठीं पीक एकवट करीत आहे; ह्यासाठीं कीं पेरणाऱ्यानें व कापणाऱ्यानेंही बरोबर आनंद करावा. ३७ एक पेरितो व एक कापितो, अशी जी ह्मण ती याविषयीं खरी आहे. ३८ ज्याविषयीं तुह्मीं श्रम केले नाहींत तें कापायला मीं तुह्मांस पाठविलें; दुसऱ्यांनीं श्रम केले आहेत व त्यांच्या श्रमांत तुह्मी शिरलां आहां.

३९ मीं केलेलें सर्व त्यानें मला सांगितलें अशी साक्ष देणाऱ्या त्या स्त्रीच्या बोलण्यावरून त्या नगरांतील बहुत शोमरोन्यांनीं त्यावर विश्वास ठेविला. ४० यामुळें शोमरोनी त्याकडे आल्यावर त्यांनीं त्याला अशी विनंति केली कीं, आपण आमच्या एथें राहावें; आणि तो तेथें दोन दिवस राहिला. ४१ तेव्हां त्याच्या वचनावरून आणखी बहुत लोकांनीं विश्वास धरिला; ४२ आणि ते त्या स्त्रीला ह्मणाले, आतां तुझ्या बोल-

ण्यावरूनच आह्मी विश्वास धरितों असें नाहीं, कारण आह्मीं स्वतां ऐकिलें आहे, आणि जाणतों कीं हा खचीत जगाचा तारणारा आहे.

४३ मग त्या दोन दिवसांनंतर तो तेथून निघून गालीलांत गेला; ४४ कारण येशूनें स्वतां साक्ष दिली कीं, प्रवक्ता स्वदेशांत सन्मान पावत नाहीं. ४५ याप्रमाणें तो गालीलांत आल्यावर गालील्यांनीं त्याचा अंगीकार केला, कारण यरूशलेमेमध्यें सणांत जें कांहीं त्यानें केलें तें सर्व त्यांनीं पाहिलें होतें, कारण तेही सणास गेले होते.

४६ यास्तव गालीलांतील कानेंत त्यानें पाण्याचा द्राक्षारस केला होता तेथें तो पुनः आला. तेथें राजाचा कोणी एक अंमलदार होता, त्याचा मुलगा कफर्णहूमांत आजारी होता. ४७ येशू यहूदीयेहून गालीलांत आला आहे असें ऐकून तो त्याकडे गेला, आणि आपण खालीं येऊन माझ्या मुलाला बरा करावा, अशी त्यानें त्याला विनंति केली; कारण तो मरणास टेंकला होता. ४८ यावर येशूनें त्याला ह्मटलें, तुह्मीं चिन्हें व उत्पात पाहिल्यावांचून विश्वास ठेवणारच नाहीं. ४९ अंमलदार त्याला ह्मणाला महाराज, माझें लेंकरूं मरण पावल्यापूर्वी आपण खालीं यावें. ५० येशूनें त्याला ह्मटलें, जा, तुझा मुलगा वांचला आहे. तो मनुष्य येशूनें त्याला सांगितलेल्या वचनावर विश्वास ठेवून चालता झाला. ५१ आणि तो खालीं जात असतां त्याचे दास त्याला भेटून ह्मणाले, आपला मुलगा वांचला आहे. ५२ यावरून त्याला कोणत्या तासीं उतार पडूं लागला, हें त्यानें त्यांस पुसलें; त्यांनीं त्याला ह्मटलें, काल सातव्या तासीं त्याचा ताप गेला. ५३ यावरून ज्या तासीं येशूनें त्याला सांगितलें कीं, तुझा मुलगा वांचला आहे, त्याच तासीं हें झालें असें बापानें जाणिलें. आणि त्यानें स्वतः व त्याच्या सर्व घराण्यानें विश्वास ठेविला. ५४ येशूनें यहूदीयेंतून गालीलांत आल्यावर पुनः जें दुसरें अद्भुत कृत्य केलें तें हेंच.

५ त्यानंतर यहूद्यांचा सण होता, तेव्हां येशू यरूशलेमेस वर गेला.

२ आणि यरूशलेमेंत मेंढरें दरवाज्याजवळ एक तळें आहे, त्याला इब्री भाषेंत बेथेस्दा ह्मणतात, त्याजवळ पांच पडव्या आहेत. ३ त्या-

मध्यें रोगी, अंधळे, लंगडे, लुळे, यांचा मोठा समुदाय पडला होता. ५ तेथें अडतीस वर्षें दुखणेकरी असा कोणी एक मनुष्य होता. ६ येशूनें तो पडलेला पाहिला आणि त्याला तसा होऊन आतां बहुत काळ झाला आहे हें जाणून त्याला ह्मटलें, तुझी बरा होण्याची इच्छा आहे काय? ७ रोग्यानें उत्तर दिलें कीं, महाराज, पाणी खवळलें असतां मला तळ्यांत टाकायास माझा मनुष्य नाहीं, आणि मी जातों इतक्यांत दुसरा कोणी माझ्या पुढें उतरतो. ८ येशूनें त्याला ह्मटलें ऊठ, आपली बाज उचलून चाल. ९ लागलाच तो मनुष्य बरा झाला व आपली बाज उचलून चालूं लागला.

त्या दिवशीं शब्बाथ होता. १० यावरून यहूदी त्या बरा झालेल्या मनुष्याला ह्मणाले, आज शब्बाथ आहे, बाज उचलणें तुला योग्य नाहीं. ११ त्यानें त्यांस उत्तर दिलें कीं, ज्यानें मला बरा केला त्यानेंच मला सांगितलें कीं, आपली बाज उचलून चाल. १२ त्यांनीं त्याला पुसलें कीं, आपली बाज उचलून चाल, असें ज्यानें तुला सांगितलें तो मनुष्य कोण आहे? १३ तो कोण आहे हें त्या बरा झालेल्या मनुष्याला ठाऊक नव्हतें, कारण त्या ठिकाणीं लोकसमुदाय असल्यामुळें येशू निसटून गेला होता. १४ त्यानंतर येशूनें त्याला देवळांत गांठून ह्मटलें पाहा, तूं बरा झालास, आतांपासून पाप करूं नको, करशील तर तुझें पूर्वापेक्षां अधिक वाईट होईल. १५ त्या मनुष्यानें जाऊन यहूद्यांस सांगितलें कीं, ज्यानें मला बरा केला तो येशू आहे. १६ यामुळें यहूदी येशूच्या पाठीस लागले, कारण तो शब्बाथ दिवशीं अशीं कामें करीत असे. १७ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, माझा बाप आजपावेतों काम करीत आहे, आणि मीही काम करीत आहें. यामुळें तर यहूदी त्याला जिवें मारायास अधिक झटले, कारण त्यानें शब्बाथ मोडिला इतकेंच नाहीं, तर देवाला आपला बाप ह्मणून त्यानें आपणाला देवासमान केलें.

१९ यावरून येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों कीं, पुत्र जें कांहीं बापाला करितांना पाहातो त्यावांचून त्याला आपल्या आपण कांहीं करितां येत नाहीं, कारण जें कांहीं तो करितो तें

पुत्रही तसेंच करितो. २० बाप पुत्रावर प्रीति करितो, आणि आपण जें कांहीं करितो तें सर्व त्याला दाखवितो, आणि तुह्मांस आश्चर्य वाटावें ह्मणून याहून मोठीं कामें त्याला दाखवील. २१ जसा बाप मेलेल्यांस उठवून जीवंत करितो तसा पुत्रही पाहिजे त्यास जीवंत करितो. २२ बाप कोणाचा न्यायही करीत नाहीं, तर सर्व न्याय करणें त्यानें पुत्राला सोंपवून दिलें आहे. २३ यासाठीं कीं जसा बापाचा सन्मान करितात तसा पुत्राचाही सन्मान सर्वांनीं करावा. जो पुत्राचा सन्मान करीत नाहीं, तो ज्यानें मला पाठविलें त्या बापाचा सन्मान करीत नाहीं. २४ मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों कीं, जो माझें वचन ऐकतो आणि ज्यानें मला पाठविलें त्यावर विश्वास ठेवितो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झालें आहे, आणि त्याला न्यायाचा प्रसंग येणार नाहीं, तो मरणांतून पार जीवनांत गेला आहे. २५ मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों कीं, असा समय येत आहे किंबहुना आतां आला आहे, कीं, यांत मेलेले देवाच्या पुत्राची वाणी ऐकतील व जे ऐकतील ते जीवंत होतील, २६ कारण जसें स्वतां बापाच्या ठायीं जीवन आहे तसें स्वतां पुत्राच्या ठायीं जीवन असावें असें त्यानें त्याला दिलें; २७ आणि तो मनुष्याचा पुत्र आहे, यास्तव न्याय करण्याचा अधिकार त्याला दिला. २८ याविषयीं आश्चर्य करूं नका, कारण असा समय येत आहे कीं, त्यांत कबरेंतलीं सर्व मनुष्यें त्याची वाणी ऐकतील; २९ आणि ज्यांनीं सत्कर्में केलीं ते जीवनाच्या पुनरुत्थानासाठीं आणि ज्यांनीं दुष्कर्में केलीं तें न्यायाच्या पुनरुत्थानासाठीं बाहेर येतील.

३० माझ्यानें आपल्या आपण कांहीं करवत नाहीं; जसें मी ऐकतों तसा न्याय करितों, आणि माझा न्याय यथार्थ आहे; कारण मी आपली इच्छा नव्हे तर ज्यानें मला पाठविलें त्याच्या इच्छेप्रमाणें करायाला पाहातों. ३१ मी आपणाविषयीं साक्ष देतों तर माझी साक्ष खरी नाहीं. ३२ मजविषयीं साक्ष देणारा दुसरा आहे, आणि जी साक्ष तो मजविषयीं देतो ती खरी आहे हें मला ठाऊक आहे. ३३ तुह्मीं योहानाकडे साक्षीसाठीं पाठविलें व त्यानें वस्तुस्थितीविषयीं साक्ष दिली. ३४ तरी मजविषयींची जी साक्ष ती मनुष्याची मला नको, तथापि तुह्मी

तारण पावावें ह्मणून हें सांगितलें. ३५ तो तेवणारा व प्रकाशणारा दीप होता, आणि तुह्मी त्याच्या प्रकाशांत कांहीं वेळ आनंद करायास मान्य झालां. ३६ परंतु मला जी साक्ष आहे ती योहानाच्यापेक्षां मोठी आहे, कारण जीं कार्यें सिद्धीस नेण्यास बापानें मला दिलीं आहेत, ह्मणजे जीं कार्यें मी करितों तीं, मजविषयीं साक्ष देतात कीं, बापानें मला पाठविलें आहे. ३७ आणखी ज्या बापानें मला पाठविलें त्यानेंच मजविषयीं साक्ष दिली आहे; तुह्मी त्याची वाणी कधींही ऐकिली नाहीं, व त्याचें स्वरूपही पाहिलें नाहीं. ३८ आणि त्याचें वचन तुह्मांमध्यें राखिलें नाहीं, कारण ज्याला त्यानें पाठविलें त्याचा तुह्मीं विश्वास धरीत नाहीं.

३९ तुह्मी शास्त्रलेख शोधून पाहतां, कारण त्यांत सार्वकालिक जीवन आपणांस प्राप्त होईल असें तुह्मीं समजतां; तेच मजविषयीं साक्ष देणारे आहेत; ४० तरी तुह्मीं जीवन पावावें ह्मणून मजकडे येण्यास इच्छीत नाहीं. ४१ मी मनुष्यांपासून मान करून घेत नाहीं. ४२ तरी मी तुह्मांस जाणतों कीं, तुमच्या ठायीं देवावरची प्रीति नाहीं. ४३ मी आपल्या बापाच्या नांवानें आलों आहें, त्या मला तुह्मीं अंगीकारीत नाहीं, दुसरा कोणी आपल्याच नांवानें आला तर त्याला अंगीकाराल. ४४ जे तुह्मीं एकमेकांपासून मान घेतां आणि एकच जो देव त्याकडला मान मिळविण्यास झटत नाहीं ते तुह्मी विश्वास कसा धराल? ४५ मी बापाजवळ तुह्मांवर दोष ठेवीन असें समजूं नका, तुह्मांवर दोष ठेवणारा असा एक आहे, ह्मणजे ज्या मोइयावर तुह्मी आशा ठेविली आहे तो. ४६ कारण तुह्मीं मोइयाचा विश्वास धरिला असता, तर माझा विश्वास धरिला असता; कारण मजविषयीं त्यानें लिहिलें. ४७ पण तुह्मीं त्याच्या लेखांचा विश्वास धरीत नाहीं, तर माझ्या वचनांचा विश्वास कसा धराल?

६ त्यानंतर येशू गालीलाच्या ह्मणजे तिबिर्या समुद्राच्या पलीकडे गेला. २ तेव्हां पुष्कळ लोकसमुदाय त्याच्यामागून चालला, कारण दुखणाइतांविषयीं जीं तो अद्भुत कृत्यें करी तीं त्यांनीं पाहिलीं होतीं. ३ येशू डोंगरावर जाऊन तेथें आपल्या शिष्यांसुद्धां बसला. ४ यहुद्यांचा

वल्हांडण सण जवळ आला होता. ५ तेव्हां येशूनें दृष्टि वर करून व मोठा समुदाय आपणाकडे येत आहे असें पाहून फिलिपाला ह्मटलें, यांस खायाला आह्मी भाकऱ्या कोठून विकत आणाव्या ? ६ हें तर त्यानें त्याची परीक्षा पाहण्याकरितां ह्मटलें, आपण काय करणार हें त्याला ठाऊक होतें. ७ फिलिपानें त्याला उत्तर दिलें कीं, यांतील एकेकानें थोडें थोडें घेतलें तरी पन्नास रुपयांच्या भाकऱ्या पुरणार नाहींत. ८ त्याच्या शिष्यांतील एक जण ह्मणजे शिमोनपेत्राचा भाऊ आंद्रिया, त्याला ह्मणाला, ९ येथें एक पोरगा आहे, त्याजवळ जवांच्या पांच भाकरी व दोन मासोळ्या आहेत, परंतु त्या इतक्यांस काय होणार? १० येशू ह्मणाला, लोकांस बसवा. त्या ठिकाणीं पुष्कळ गवत होतें. बसणाऱ्या लोकांची संख्या सुमारें पांच हजार होती. ११ येशूनें त्या भाकरी घेतल्या; आणि उपकारस्तुति केल्यावर बसलेल्यांस वांटून दिल्या; तसेंच त्या मासोळ्यांतूनही त्यांस पाहिजे तितकें दिलें. १२ ते तृप्त झाल्यावर त्यानें आपल्या शिष्यांस सांगितलें, कांहीं फुकट जाऊं नये ह्मणून उरलेलें तुकडे गोळा करा. १३ मग जेवणाऱ्यांस पुरून जवांच्या पांच भाकऱ्या पैकीं उरलेले तुकडे त्यांनीं गोळा केले, त्या तुकड्यांनीं बारा टोपल्या भरल्या. १४ त्यानें केलेलें अद्भुत कृत्य पाहून त्या मनुष्यांनीं ह्मटलें कीं जगांत येणारा जो प्रवक्ता तो खरोखर हाच आहे.

१५ राजा करण्याकरितां ते येऊन मला धरण्यास पाहात आहेत हें जाणून येशू पुनः डोंगरावर एकटाच निघून गेला.

१६ संध्याकाळ झाल्यावर त्याचे शिष्य खालीं समुद्राकडे गेले; १७ आणि मचव्यांत बसून समुद्राच्या पलीकडे कफर्णहूमास चालले. इतक्यांत अंधार पडला. तोंवर येशू त्यांच्या जवळ आला नव्हता. १८ मोठा वारा सुटून समुद्र खवळत होता. १९ मग सुमारें कोस सवा कोस वल्हावून गेल्यावर त्यांनीं येशूला समुद्रावरून चालत मचव्याजवळ येतांना पाहिलें, आणि ते भ्याले. २० परंतु तो त्यांस ह्मणाला, मी आहें, भिऊ नका. २१ यास्तव त्याला मचव्यावर घेण्याची त्यांस इच्छा झाली; इतक्यांत त्यांस जायाचें होतें त्या ठिकाणीं मचवा किनाऱ्यास पोंचला.

२२ दुसऱ्या दिवशीं जो समुदाय समुद्राच्या पलीकडे उभा होता त्यानें पाहिलें कीं, ज्या एका मचव्यांत त्याचे शिष्य बसले होते त्यावांचून तेथें दुसरा मचवा नव्हता, आणि येशू आपल्या शिष्यांबरोबर मचव्यांत बसला नव्हता, तर त्याचे शिष्य मात्र निघून गेले होते. २३ (तरी जेथें प्रभूनें उपकारस्तुति केल्यावर त्यांनीं भाकरी खाल्ली त्या ठिकाणाजवळ तिबिर्येपासून दुसरे मचवे आले होते,) २४ तेथें येशू नाहीं व त्याचे शिष्यही नाहींत असें समुदायानें पाहिलें, तेव्हां ते मचव्यांत बसून येशूचा शोध करीत कफर्णहूमास आले. २५ आणि तो त्यांस समुद्राच्या पलीकडे भेटल्यावर ते त्याला ह्मणाले, गुरुजी, येथें कधीं आलास? २६ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, तुह्मी अद्भुतें पाहिलीं ह्मणून नाहीं, तर तुह्मी भाकऱ्या खाऊन तृप्त झालां ह्मणून माझा शोध करितां. २७ नाशवंत अन्नासाठीं श्रम करूं नका, तर सार्वकालिक जीवनासाठीं टिकणारें जें अन्न मनुष्याचा पुत्र तुह्मांस देईल, त्यासाठीं श्रम करा, कारण बाप जो देव त्यानें त्यावर शिक्का मारिला आहे. २८ यावरून त्यांनीं त्याला ह्मटलें, देवाचीं कामें आह्माकडून व्हावीं ह्मणून आह्मी काय करावें? २९ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, देवाचें काम हेंच आहे कीं, ज्याला त्यानें पाठविलें त्यावर तुह्मी विश्वास ठेवावा. ३० यावरून त्यांनीं त्याला ह्मटलें कीं, आह्मी जें पाहून तुजवर विश्वास ठेवावा असें तूं काय अद्भुत कृत्य करितोस? तूं काय काम करितोस? ३१ आमच्या पूर्वजांनीं अरण्यांत मान्ना खाल्ला; असें लिहिलें आहे कीं, "त्यानें त्यांस स्वर्गातून भाकरी खायाला दिली." ३२ यावरून येशूनें त्यांस ह्मटलें, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, मोश्यानें तुह्मांस स्वर्गातून येणारी भाकरी दिली नाहीं, माझा बाप तर स्वर्गातून येणारी खरी भाकरी तुह्मांस देतो. ३३ कारण जी स्वर्गातून उतरते व जगाला जीवन देते ती देवाची भाकरी होय. ३४ यास्तव ते त्याला ह्मणाले, हे प्रभू, ही भाकरी आह्मांस नित्य दे. ३५ येशूनें त्यांस ह्मटलें, जीवनाची भाकरी मी आहें. जो मजकडे येतो त्याला भूक लागणार नाहीं, आणि जो मजवर विश्वास ठेवितों त्याला कधींही तहान लागणार नाहीं. ३६ परंतु तुह्मी मला पाहिलें असतांही विश्वास

ठेवीत नाहीं, असें मी तुह्मांस सांगितलें. ३७ बाप जें मला देतो तें सर्व मजकडे येईल, आणि जो मजकडे येतो त्याला मी घालवि-णार नाहींच. ३८ कारण मी आपल्या इच्छेप्रमाणें नाहीं, तर ज्यानें मला पाठविलें त्याच्या इच्छेप्रमाणें करावें ह्मणून स्वर्गांतून उतरलों आहें. ३९ आणि ज्यानें मला पाठविलें त्याची इच्छा हीच आहे कीं, त्यानें जें सर्व मला दिलें त्यांतून मी कांहीं हरवूं नये, तर शेवटल्या दिवशीं मी तें उठवावें. ४० माझ्या बापाची इच्छा हीच आहे कीं, जो कोणी पुत्राला पाहून त्यावर विश्वास ठेवितो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें, त्याला शेवटल्या दिवशीं मी उठवीन.

४१ मी स्वर्गांतून उतरलेली भाकरी आहें असें तो ह्मणाला, ह्मणून यहूदी त्याविषयीं कुरकूर करूं लागले. ४२ त्यांनीं ह्मटलें कीं, योसे-फाचा पुत्र येशू ज्याचीं आईबापें आह्मास ठाऊक आहेत तोच हा आहे ना ? तर तो आतां कसें ह्मणतों कीं, मी स्वर्गांतून उतरलों आहें ? ४३ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, तुह्मी आपआपणांत कुरकूर करूं नका. ४४ ज्यानें मला पाठविलें त्या बापानें ओढिल्यावांचून कोणाच्यानें मजकडे येववत नाहीं; त्याला शेवटल्या दिवशीं मी उठवीन. ४५ प्रव-क्त्याच्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, "ते सर्व देवानें शिकविलेले असे होतील." जो कोणी बापापासून ऐकून शिकला आहे तो मजकडे येतो. ४६ बापाला कोणीं पाहिलें आहे असें नाहीं; जो देवापासून आहे त्यानें मात्र बापाला पाहिलें आहे. ४७ मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, जो विश्वास धरितो त्याला सार्वकालिक जीवन आहे. ४८ मी जीवनाची भाकरी आहें. ४९ तुमच्या पूर्वजांनीं अरण्यांत मान्ना खाल्ला तरी ते मेले. ५० स्वर्गांतून उतरणारी भाकरी अशी आहे कीं, ती कोणीं खाल्ली तर तो मरणार नाहीं. ५१ स्वर्गांतून उतरलेली जीवंत भाकरी मी आहें; या भाकरींतून जो कोणीं खाईल तो सर्वकाळ वांचेल, जी भाकरी मी देईन ती जगाच्या जीवनासाठीं माझा देह अशी आहे.

५२ यास्तव यहूदी आपआपणांमध्यें असा वादविवाद करूं लागले कीं हा आह्मांस आपला देह खायाला कसा देईल ? ५३ यावरून येशू त्यांस ह्मटलें, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, तुह्मी मनुष्याच्या पुत्राचा

देह खाल्ला नाहीं व त्याचें रक्त प्यालें नाहीं तर तुह्मामध्यें जीवन नाहीं. ५४ जो माझा देह खातो व माझें रक्त पितो त्याला सार्वकालिक जीवन आहे, त्याला शेवटल्या दिवशीं मी उठवीन. ५५ कारण माझा देह खरें खाणें आहे व माझें रक्त खरें पिणें आहे. ५६ जो माझा देह खातो व माझें रक्त पितो तो मजमध्यें राहतो व मी त्यामध्यें राहतों. ५७ जसें जीवंत बापानें मला पाठविलें आणि मी बापामुळें वांचतों, तसें जो मला खातो तोही मजमुळें वांचेल. ५८ स्वर्गांतून उतरलेली जी भाकरी ती हीच आहे; पूर्वजांनीं खाल्लें तरी ते मेले, तसें नाहीं; जो ही भाकरी खातो तो सर्वकाळ वांचेल. ५९ तो कफर्णहूमांत उपदेश करीत असतां त्यानें सभास्थानांत या गोष्टी सांगितल्या.

६० त्याच्या शिष्यांपैकीं बहुतांनीं ऐकून ह्मटलें, हें वचन कठीण आहे, हें कोणाच्यानें ऐकवेल ? ६१ आपले शिष्य याविषयीं कुरकूर करीत आहेत हें मनांत जाणून येशू त्यांस ह्मणाला, तुम्हीं यामुळें अडखळतां काय ? ६२ मनुष्याचा पुत्र पूर्वी जेथें होता तिकडे जर तुह्मी त्याला चढतांना पाहाल तर—? ६३ जीवंत करणारा तो आत्माच आहे, देहापासून कांहीं लाभ होत नाहीं, मीं जीं वचनें तुह्मांस सांगितलीं आहेत तीं आत्मा व जीवन आहेत. ६४ तरी तुह्मांपैकीं असे कित्येक आहेत कीं ते विश्वास धरीत नाहींत. विश्वास न धरणारे कोण आणि आपणाला धरून देणारा कोण हें येशूला पहिल्यापासून ठाऊक होतें. ६५ आणि तो ह्मणाला, यासाठींच मीं तुह्मांस सांगितलें आहे कीं, माझ्या बापापासून त्याला ही देणगी मिळाल्यावांचून कोणाच्यानें मजकडे येववत नाहीं.

६६ यावरून त्याच्या शिष्यांतील बहुत परत गेले, ते पुनः कधीं त्याबरोबर चालले नाहींत. ६७ यास्तव येशू बारा शिष्यांस ह्मणाला, तुह्मीही निघून जाण्यास इच्छितां काय ? ६८ शिमोन पेत्रानें त्याला उत्तर दिलें कीं, हे प्रभू, आह्मी कोणाकडे जाऊं ? सार्वकालिक जीवनांचीं वचनें तुजपाशीं आहेत. ६९ आणि तूं पवित्र देवाचा पुत्र आहेस, असा आह्मीं विश्वास धरिला आहे व जाणिलें आहे. ७० येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं मीं तुह्मां बारा जणांस निवडून घेतलें कीं नाहीं ? तरी तुह्मांतील एकजण सैतान आहे. ७१ हें तो शिमोन इस्कर्योत याचा पुत्र यहूदा

याविषयीं बोलला, कारण तो बारा शिष्यांतील एक असतां त्याला धरून
देणारा होता.

७ यानंतर येशू गालीलांत फिरला, कारण यहूदी त्याला जिवें मारा-
यास पाहत होते, ह्मणून त्यानें यहूदीयेंत फिरायास इच्छिलें नाहीं.
२ यहूद्यांचा सण ह्मणजे मंडपांचा सण जवळ आला होता. ३ यास्तव
त्याचे भाऊ त्याला ह्मणाले, तूं एथून निघून यहूदीयेंत जा, यासाठीं कीं
जीं कामें तूं करितोस तीं तुझ्या शिष्यांनींही पाहावीं. ४ जो कोणी प्रसिद्ध
व्हायास पाहतो तो गुप्तपणें कांहीं करीत नाहीं. हीं कामें करितोस तर
आपणास जगाला प्रगट कर. ५ त्याच्या भावांनींही त्यावर विश्वास
ठेविला नव्हता. ६ यावरून येशू त्यांस ह्मणाला, माझा समय अजून
आला नाहीं, तुमचा समय तर सर्वदा सिद्ध आहे. ७ जगानें तुमचा
द्वेष करावा असें होत नाहीं, तर तें माझा द्वेष करितें, कारण त्यांचीं कामें
वाईट आहेत अशी मी त्याविषयीं साक्ष देतों. ८ तुह्मी सणास वर जा;
माझा समय अजून पूर्ण झाला नाहीं, यास्तव मी आतांच या सणास
जात नाहीं. ९ असें त्यांस सांगून तो गालीलांत राहिला.

१० त्याचे भाऊ सणास गेल्यानंतर तोही प्रसिद्धपणें नाहीं, तर गुप्त-
पणें वर गेला. ११ यावरून तो कोठें आहे असें ह्मणत यहूदी त्याच्या
सणांत शोध करूं लागले. १२ आणि लोकसमुदायांत त्याविषयीं
बहुत कुजबूज चालली; कोणी ह्मणाले, तो चांगला मनुष्य आहे; कोणी
ह्मणाले, नाहीं; तो तर लोकांस फसवितो. १३ तरी यहूद्यांच्या भयामुळें त्याविषयीं कोणी उघड बोलला नाहीं.

१४ मग सणाचा मध्य झाला असतां येशू वर देवळांत जाऊन उपदेश
करूं लागला. १५ यावरून यहूदी आश्चर्य करून ह्मणाले, शिकल्याविंचून याला विद्या कशी आली? १६ यास्तव येशूनें त्यांस उत्तर दिलें
कीं, माझें शिक्षण माझें नाहीं तर ज्यानें मला पाठविलें त्याचें आहे.
१७ त्याच्या इच्छेप्रमाणें करायास जर कोणी इच्छील तर ह्या शिक्षणाविषयीं त्याला समजेल कीं हें देवापासून आहे किंवा मी आपल्या आपण
बोलतों. १८ जो आपल्या आपण बोलतो तो आपलेंच गौरव पाहतो;
परंतु ज्यानें त्याला पाठविलें त्याचें गौरव जो पाहतो तो खरा आहे;

त्यामध्यें कांहीं अधर्म नाहीं. १९ मोश्यानें तुह्मांस नियमशास्त्र दिलें कीं नाहीं? तरी तुह्मांतून कोणी नियमशास्त्र पाळीत नाहीं, तुह्मी मला जिवें मारायास कां पाहतां? २० समुदायानें उत्तर दिलें कीं तुला भूत लागलें आहे, तुला जिवें मारायास कोण पाहतो? २१ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं मीं एक कृत्य केलें, आणि त्यामुळें तुह्मी सर्व आश्चर्य करितां. २२ सुंता मोश्यापासून नाहीं तर पूर्वजांपासून आहे ह्मणून मोश्यानें ती तुह्मांस लावून दिली, आणि तुह्मी शब्बाथ दिवशीं ती करितां. २३ मोश्याचें नियमशास्त्र मोडूं नये ह्मणून शब्बाथ दिवशीं मनुष्याची सुंता होत, तर मीं शब्बाथ दिवशीं एका मनुष्याला सर्वांगीं बरा केला यामुळें तुह्मीं मजवर रागें भरतां काय? २४ तोंडदेखला न्याय करूं नका, तर यथार्थ न्याय करा.

२५ यावरून यरूशलेमकरांतून कित्येकांनीं ह्मटलें, ज्याला जिवें मारायास पाहतात तो हाच आहेना? २६ आणि पाहा, तो उघड बोलतो च ते त्याला कांहीं ह्मणत नाहींत; हा खिस्त आहे असें अधिकारी खरोखर जाणतात काय? २७ तरी हा कोठचा आहे हें आह्मांस ठाऊक आहे. खिस्त येईल तेव्हां तर तो कोठचा आहे हें कोणी जाणणार नाहीं. २८ यावरून येशू देवळांत उपदेश करीत असतां मोठ्यानें ह्मणाला, तुह्मी मला जाणतां व मी कोठचा आहें हेंही जाणतां, तरी मी आपल्या आपण आलों नाहीं, तर ज्यानें मला पाठविलें तो खरा आहे, त्याला तुह्मी जाणत नाहीं; २९ मी तर त्याला जाणतों, कारण मी त्यापासून आहें व त्यानें मला पाठविलें आहे. यावरून त्यांनीं त्याला धरायास पाहिलें, तरी कोणीं त्यावर हात टाकिला नाहीं, कारण त्याचा समय तोंवर आला नव्हता. ३१ तेव्हां समुदायांतील बहुत लोकांनीं त्यावर विश्वास ठेविला, व ह्मटलें कीं, खिस्त येईल तेव्हां तो त्यानें केलेल्यापेक्षां अधिक अद्भुतें करील काय? ३२ लोक त्याविषयीं अशी कुजबूज करीत आहेत हें परूशांनीं ऐकिलें आणि मुख्य याजक व परूशी यांनीं त्याला धरायास कामदार पाठविले. ३३ यावरून येशूनें त्यांस ह्मटलें, मी अणखी थोडा वेळ तुह्मांबरोबर आहें, मग ज्यानें मला पाठविलें त्याकडे मी निघून जाईन. ३४ तुह्मी माझा शोध कराल तरी मी तुम्हांस सांपडणार नाहीं, आणि

जेथें मी असेन तेथें तुमच्यानें येववणार नाहीं. ३५ यावरून यहूदी आपआपणांत ह्मणाले, हा असा कोठें जाणार, कीं तो आह्मांस सांपडणार नाहीं ? तो हेल्लेणी लोकांत पांगलेल्यांकडे जाणार आणि हेल्लेण्यांस शिकविणार काय ? ३६ तुम्ही माझा शोध कराल तरी मी तुम्हांस सांपडणार नाहीं, आणि जेथें मी असेन तेथें तुमच्यानें येववणार नाहीं, हें जें वाक्य त्यानें ह्मटलें तें काय आहे ?

३७ मग सणाचा शेवटला जो मोठा दिवस त्या दिवशीं येशू उभा राहून मोठ्यानें ह्मणाला, कोणी तान्हेला असला तर त्यानें मजकडे येऊन प्यावें. ३८ जो मजवर विश्वास ठेवितो, त्यांच्या आंतून शास्त्रांत सांगि तल्याप्रमाणें जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील. ३९ हें तर ज्यांनीं त्याव विश्वास ठेविला त्यांस जो आत्मा मिळणार होता त्याविषयीं त्यानें ह्मटलें तोंपर्यंत आत्म्याचें दान झालें नव्हतें, कारण येशू तोंपर्यंत गौरविल नव्हता. ४० यास्तव समुदायांतील कित्येकांनीं हे शब्द ऐकून ह्मटलें हा खरोखर तो प्रवक्ता आहे. ४१ कित्येकांनीं ह्मटलें, हा ख्रिस्त आहे कांहींनीं ह्मटलें, ख्रिस्त गालीलांतून येतो काय ? ४२ ख्रिस्त "दावीद दाच्या वंशाचा" व ज्या "बेथलहेमांत" दावीद होता त्या गांवचा असे "येणार" असें शास्त्रांत सांगितलें नाहीं काय ? ४३ यावरून त्याविषय समुदायांत फूट पडली. ४४ आणि त्यांतील कित्येक त्याला धराया पाहात होते, तरी कोणीं त्यावर हात टाकिला नाहीं.

४५ यास्तव मुख्य याजक व परूशी यांकडे कामदार आले, त्यांस ह्मणाले, तुह्मीं त्याला कां आणिलें नाहीं ? ४६ कामदारांनीं उत्तर दिलें कीं, कोणी मनुष्य त्यासारखा कधीं बोलला नाहीं. ४७ त्यावरून परूशांनीं त्यांस ह्मटलें कीं, तुह्मीही फसलां आहां काय ? ४८ अधिकाऱ्यांपैकीं किंवा परूशांपैकीं तरी कोणीं त्यावर विश्वास ठेविला आहे काय ? ४९ जो हा लोकसमुदाय नियम जाणत नाहीं तो शापित आहे. ५० जो निकदेम त्याकडे पूर्वी आला होता तो त्यांपैकीं एक असून त्याने ह्मणाला, ५१ कोणाचें ऐकून घेतल्यावांचून व तो काय करितो हें जाणून घेतल्यावांचून आमचें नियमशास्त्र त्याचा न्याय करितें काय ? ५२ त्यांनी त्याला उत्तर दिलें कीं, तूंही गालीलांतला आहेस काय ? शोध करून पाह

कीं, गालीलांत कोणी प्रवक्ता उत्पन्न होत नाहीं. [५३ मग ते सर्व आपापल्या घरीं निघून गेले.

८ येशू तर जईत झाडांच्या डोंगराकडे गेला. २ नंतर मोठ्या सकाळीं तो पुनः देवळांत आला, आणि सर्व लोक त्याकडे आले, तो बसून त्यांस शिकवूं लागला. ३ तेव्हां शास्त्री व परूशी यांनीं व्यभिचार करितांना धरलेली एक स्त्री त्याकडे आणिली, व तिला मध्यें उभी करून त्याला ह्मटलें, ४ हे गुरू, ही स्त्री व्यभिचार करितांनाच धरलेली आहे. ५ मोझ्यानें तर नियमशास्त्रांत आम्हांस अशी आज्ञा दिली आहे कीं अशांस धोंडमार करावा, तर तूं तिजविषयीं काय सांगतोस ? ६ त्यावर दोष ठेवायाला आपणांस कांहीं निमित्त व्हावें ह्मणून त्याची परीक्षा पाहाण्याकरितां त्यांनीं हें ह्मटलें. येशू तर खालीं ओणवून बोटानें भूमीवर लिहूं लागला. ७ आणि ते त्याला पुसत राहिले असतां तो उठून त्यांस म्हणाला, तुम्हांमध्यें जो निष्पाप असेल त्यानें प्रथम तिजवर धोंडा टाकावा. ८ मग त्यानें पुनः खालीं ओणवून भूमीवर लिहिलें. ९ हें ऐकून वडिलांपासून आरंभ करून एकामागून एक असे शेवटल्यापर्यंत ते सर्व निघून गेले; आणि येशू एकटा राहिला आणि तेथेंच ती स्त्री मध्यें उभी होती. १० नंतर येशू उठला, व स्त्रीशिवाय येथें कोणी नाहीं असें पाहून तिला म्हणाला, बाई, ते तुला दोष देणारे कोठें आहेत ? तुला कोणीं दंड ठरविला नाहीं काय ? ११ ती म्हणाली, कोणी नाहीं. प्रभू येशू तिला ह्मणाला, मीही तुला दंड ठरवीत नाहीं; जा, यापुढें पाप करूं नको.]

१२ यास्तव येशूनें पुनः त्यांशीं बोलत असतां म्हटलें, मी जगाचा प्रकाश आहें, जो मला अनुसरतो तो अंधारांत चालणारच नाहीं, तर त्याजवळ जीवनाचा प्रकाश असेल. १३ यावरून परूशी त्याला म्हणाले, तूं आपणाविषयीं साक्ष देतोस, तुझी साक्ष खरी नाहीं. १४ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, जरी मी आपणाविषयीं साक्ष देतों तरी माझी साक्ष खरी आहे; कारण मी कोठून आलों व कोठें जातों हें मला ठाऊक आहे; मी कोठून येतों व कोठें जातों हें तुम्हांस ठाऊक नाहीं. १५ तुम्ही देहबुद्धीनें न्याय करितां; मी कोणाचा न्याय करीत नाहीं, १६ आणि जर मीं न्याय केला तर माझा न्याय खरा आहे, कारण मी एकटा नाहीं, तर मी

व ज्यानें मला पाठविलें तो असे आहों. १७ तुमच्या नियमशास्त्रांत असें लिहिलें आहे कीं दोन मनुष्यांची साक्ष खरी आहे. १८ मी आपणाविषयीं साक्ष देणारा आहें, आणि ज्या बापानें मला पाठविलें तोहीं मजविषयीं साक्ष देतो. १९ यावरून ते त्याला म्हणाले, तुझा बाप कोठें आहे ? येशूनें उत्तर दिलें कीं, तुम्ही मला व माझ्या बापालाही जाणत नाहीं; जर तुम्हीं मला जाणिलें असतें तर माझ्या बापालाही जाणिलें असतें. २० तो देवळांत शिकवीत असतां हीं वचनें भांडारांत बोलला; तरी कोणीं त्याला धरिलें नाहीं, कारण त्याचा समय तोंपर्यंत आला नव्हता.

२१ यास्तव त्यांस तो पुनः म्हणाला, मी निघून जातों, आणि तुह्मीं माझा शोध कराल आणि आपल्या पापांत मराल; जेथें मी जातों तेथें तुमच्यानें येववत नाहीं. २२ यास्तव यहूदी ह्मणाले, जेथें मी जातों तेथें तुमच्यानें येववत नाहीं; असें तो ह्मणतो यावरून तो आपणास जिवें मारून घेणार आहे कीं काय ? २३ त्यानें त्यांस ह्मटलें, तुम्ही खालचें आहां, मी वरचा आहें, तुम्ही या जगाचे आहां, मी या जगाचा नाहीं. २४ यास्तव मीं तुम्हांस सांगितलें कीं, तुह्मी आपल्या पापांत मराल; कारण मी तो आहें, असा जर तुह्मी विश्वास धरणार नाहीं तर तुम्हीं आपल्या पापांत मराल. २५ यास्तव त्यांनीं त्याला म्हटलें, तूं कोण आहेस ? येशूनें त्यांस म्हटलें, जें पहिल्यापासून तुह्मांस सांगत आलों तेंच. २६ तुह्मांविषयीं मला बहुत बोलायाचें आहे व न्याय करायाचा आहे; ज्यानें मला पाठविलें तो खरा आहे, आणि ज्या गोष्टी मीं त्यापासून ऐकिल्या त्या मी जगास सांगतों. २७ तो आम्हांसीं बापाविषयीं बोलतो, असें ते समजले नाहींत. २८ यास्तव येशूनें त्यांस म्हटलें, जेव्हां तुह्मी मनुष्याच्या पुत्राला उंच कराल तेव्हां तुह्मी जाणाल कीं, मीं तो आहें, आणि मी आपल्या आपण कांहीं करीत नाहीं, तर बापानें मला शिकविल्याप्रमाणें मी या गोष्टी बोलतों. २९ आणि ज्यानें मला पाठविलें तो माझ्याबरोबर आहे. त्यानें मला एकटें सोडिलें नाहीं; कारण जें त्याला आवडतें तें मी सर्वदा करितों. ३० तो या गोष्टी बोलत असतां बहुत लोकांनीं त्यावर विश्वास ठेविला.

३१ यास्तव ज्या यहूद्यांनीं त्याचा विश्वास धरिला त्यांस येशूनें म्हटलें, जर तुह्मी माझ्या वचनांत राहिलां तर खरोखर माझे शिष्य आहां; ३२ आणि तुह्मी सत्य जाणाल, व सत्य तुम्हांस स्वतंत्र करील. ३३ त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं आह्मी अब्राहामाचा वंश आहों व कधींही कोणाच्या दास्यांत नव्हतों, तर तुह्मी स्वतंत्र व्हाल असें तूं कसें ह्मणतोस ? ३४ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, जो कोणी पाप करितो तो पापाचा दास आहे. ३५ आणि दास घरांत सर्वकाळ रहात नाहीं, पुत्र सर्वकाळ राहतो. ३६ यास्तव जर पुत्र तुम्हांस स्वतंत्र करील तर तुह्मी खरे स्वतंत्र व्हाल. ३७ तुह्मी अब्राहामाचा वंश आहां हें मला ठाऊक आहे, तरी तुह्मांत माझ्या वचनाची गति होत नाहीं ह्मणून तुह्मी मला जिवें मारायास पाहतां. ३८ मी बापाजवळ जें पाहिलें तें बोलतों. तसेच तुम्ही आपल्या बापापासून जें ऐकिलें तें करितां. ३९ त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, आमचा बाप अब्राहाम आहे. येशूनें त्यांस म्हटलें, जर तुम्ही अब्राहामाचीं लेंकरें असतां तर तुम्हीं अब्राहामाची कृत्यें केलीं असतीं. ४० परंतु आतां ज्यानें देवापासून ऐकलेलें सत्य तुह्मांस सांगितलें त्या मला मनुष्याला आतां जिवें मारायास पाहतां; अब्राहामानें असें केलें नाहीं. ४१ तुह्मी आपल्या बापाचीं कृत्यें करितां. ते त्याला ह्मणाले, आह्मी व्यभिचारापासून जन्मलों नाहीं; आम्हांस एकच बाप, म्हणजे देव आहे. ४२ येशूनें त्यांस म्हटलें, जर देव तुमचा बाप असता तर तुम्हीं मजवर प्रीति केली असती, कारण मी देवापासून निघालों व आलों आहें; मी आपल्या आपण आलों नाहीं, तर त्यानें मला पाठविलें. ४३ तुम्ही माझें बोलणें कां समजत नाहीं ? याचें कारण असें कीं तुमच्यानें माझें वचन ऐकवत नाहीं. ४४ तुम्ही सैतान बापापासून झालां आहां, आणि आपल्या बापाच्या वासनांप्रमाणें करायास इच्छितां. तो प्रारंभापासून मनुष्यघातक आहे आणि तो सत्यांत टिकला नाहीं, कारण त्यामध्यें सत्य नाहीं, तो खोटें बोलतो तें आपल्यांतूनच बोलतो, कारण तो लबाड व लबाडाचा बाप आहे. ४५ मी तर तुम्हांस सत्य सांगतों म्हणून तुम्ही माझा विश्वास धरीत नाहीं. ४६ तुम्हांतील कोण मजवर पाप लागू करील ? मी सत्य सांगत असतां तुम्ही माझा कां विश्वास धरीत नाहीं ?

४७ जो देवाकडला आहे तो देवाच्या गोष्टी ऐकतो, तुम्ही देवाकडले नव्
याच कारणानें तुम्ही ऐकत नाहीं. ४८ यहूद्यांनीं त्याला उत्तर दिलें क
तूं शोमरोनी आहेस व तुला भूत लागलें आहे, हें आम्ही ठीक म्हणा
कीं नाहीं ? ४९ येशूनें उत्तर दिलें कीं मला भूत लागलें नाहीं, तर
आपल्या बापाचा सन्मान करितों, आणि तुम्ही माझा अपमान करित
५० मी तर आपलें गौरव पाहत नाहीं, तें पाहणारा व न्याय करणा
कोणी एक आहे. ५१ मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों, जर कोण
माझें वचन पाळील तर तो कधींही मरण पाहणारच नाहीं. ५२ यहू
त्याला म्हणाले, तुला भूत लागलें आहे हें आतां आम्हांस कळलें. अब्र
हाम व प्रवक्तेही मेले आणि तूं म्हणतोस, जर कोणी माझें वचन पाळी
तर त्याला कधींही मरणाचा अनुभव होणारच नाहीं. ५३ जो आम
बाप अब्राहाम मेला त्यापेक्षां तूं मोठा आहेस काय ? प्रवक्तेही मेले,
आपणाला कोण म्हणवितोस ? ५४ येशूनें उत्तर दिलें कीं मी स्व
आपलें गौरव केलें तर तें कांहीं माझें गौरव नाहीं, माझें गौरव करणा
माझा बाप आहे, त्याला तो आमचा देव आहे असें तुम्ही म्हणतां. ५
तरी तुम्हीं त्याला जाणलें नाहीं; मी तर त्याला जाणतों; आणि मी त्या
जाणत नाहीं असें जर म्हणेन तर तुमच्या सारिखा लबाड होईन; त
मी त्याला जाणतों व त्याचें वचन पाळितों. ५६ तुमचा बाप अब्राहा
माझा दिवस पाहण्याच्या उत्कंठेनें उल्लासित झाला व पाहून हर्ष पावल
५७ यावरून यहूदी त्याला म्हणाले, तुला अजून पन्नास वर्षें झालीं नाहींत
आणि तूं अब्राहामाला पाहिलें काय ? ५८ येशूनें त्यांस म्हटलें
तुम्हांस खचीत खचीत सांगतों अब्राहाम झाला त्यापूर्वी मी आहें. ५
यावरून त्यांनीं त्यावर फेंकण्याकरितां धोंडे उचलिले, परंतु येशू देवळ
तून गुप्तपणें निघून गेला.

९ तो जवळून जात असतां त्यानें एक जन्मांध मनुष्य पाहिला.
तेव्हां त्याच्या शिष्यांनीं त्याला विचारिलें कीं, गुरुजी, हा अंधळ
जन्मावा असें पाप कोणीं केलें, यानें किंवा याच्या आईबापांनीं ?
येशूनें उत्तर दिलें कीं, यानें किंवा याच्या आईबापांनीं पाप केलें अ
नाहीं, तर यांत देवांचीं कामें प्रकट व्हावीं म्हणून हा असा जन्मल

४ मला ज्यानें पाठविलें त्याचीं कामें दिवस आहे तोंपर्यंत आह्मांस केलीं पाहिजेत; रात्र येणार आहे तींत कोणाच्यानें काम करवणार नाहीं. ५ मी जगांत आहें तो मी जगाचा प्रकाश आहें. ६ असें बोलून तो भूमीवर थुंकला, आणि थुंक्यानें चिखल केला आणि तो चिखल त्याच्या डोळ्यांस लाविला. ७ आणि त्याला ह्मटलें, जा, शिलोह (ह्मणजे पाठविलेला) तळ्यांत धू; यास्तव त्यानें जाऊन धुतल्यावर तो डोळस होऊन आला. ८ यावरून शेजारी व ज्यांनीं त्याला भिकारी असा पूर्वीं पाहिला होता, ते ह्मणाले, बसून भीक मागणारा तो हाच नाहीं काय ? ९ कित्येक ह्मणाले, तोच हा आहे. दुसरे ह्मणाले, नाहीं, त्यासारिखा आहे; तो ह्मणाला, मी तोच आहें. १० यावरून त्यांनीं त्याला ह्मटलें, तुझे डोळे कसे उघडले ? ११ त्यानें त्यांस उत्तर दिलें कीं येशू नांवाच्या मनुष्यानें चिखल करून माझ्या डोळ्यांस लाविला, आणि मला सांगितलें कीं, शिलोह वर जाऊन धू, ह्मणून मीं जाऊन धुतलें, आणि मला दृष्टि आली. १२ तेव्हां त्यांनीं त्याला ह्मटलें, तो कोठें आहे ? तो ह्मणाला, मला ठाऊक नाहीं.

१३ त्यांनीं जो पूर्वीं अंधळा होता त्याला परूशांकडे नेलें. १४ ज्या दिवशीं येशूनें चिखल करून त्याचे डोळे उघडिले, तो दिवस शब्बाथ होता. १५ यास्तव परूशांनींही त्याला आणखी पुसलें कीं, तुला दृष्टि कशी आली ? तो त्यांस ह्मणाला, त्यानें माझ्या डोळ्यांस चिखल लाविला, आणि मी धुतलें आणि मला दिसूं लागलें. १६ यावरून परूशांतील कित्येक ह्मणाले, तो मनुष्य देवापासून नाहीं, कारण तो शब्बाथ पाळित नाहीं. दुसरे ह्मणाले, पापी माणसाच्यानें अशीं अद्भुतें कशीं करवतील ? अशी त्यांच्यामध्यें फूट पडली. १७ यास्तव पुनः ते त्या अंधळ्याला ह्मणाले, त्यानें तुझे डोळे उघडिले तर त्याविषयीं तूं काय ह्मणतोस ? त्यानें ह्मटलें कीं तो प्रवक्ता आहे. १८ यहूद्यांनीं त्या दृष्टि पावलेल्याच्या आईबापांस बोलावून विचारिलें तोंपर्यंत तो अंधळा असून दृष्टि पावला असा त्यांनीं त्याविषयीं विश्वास धरिला नव्हता. १९ त्यांनीं त्यांस विचारिलें कीं, जो तुमचा पुत्र अंधळा जन्मला ह्मणून ह्मणतां, तो हाच आहे काय ? तर याला आतां कसें दिसतें ? २० त्याच्या आईबापांनीं

त्यांस उत्तर दिलें कीं, हा आमचा पुत्र आहे व हा अंधळा जन्मला हें आम्हांस ठाऊक आहे; २१ तरी त्याला आतां कसें दिसतें हें आम्हांस ठाऊक नाहीं, किंवा त्याचे डोळे कोणीं उघडिले हेंही आम्हांस ठाऊक नाहीं; त्याला विचारा, तो वयांत आलेला आहे, तो आपणाविषयीं सांगेल. २२ त्याच्या आईबापांस यहूद्यांचें भय होतें म्हणून त्यांनीं असें म्हटलें, कारण हा ख्रिस्त असें जर कोणी पतकरील तर तो सभाबहिष्कृत व्हावा असा यहूद्यांनीं अगोदरच एकोपा केला होता. २३ यामुळें त्याच्या आईबापांनीं म्हटलें कीं, तो वयांत आलेला आहे, त्याला विचारा. २४ यास्तव जो मनुष्य पूर्वीं अंधळा होता त्याला त्यांनीं दुसऱ्यानें बोलावून म्हटलें, देवाचें गौरव कर, तो मनुष्य पापी आहे हें आम्हांस ठाऊक आहे. २५ यावरून त्यानें उत्तर दिलें कीं, तो पापी आहे किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं; पण एक मला ठाऊक आहे कीं, मी पूर्वीं अंधळा असून, आतां, मला दिसतें. २६ यास्तव त्यांनीं त्याला म्हटलें, त्यानें तुला काय केलें ? त्यानें तुझे डोळे कसे उघडिले ? २७ त्यानें त्यांस उत्तर दिलें, आतांच मीं तुम्हांस सांगितलें तरी तुम्ही ऐकिलें नाहीं; पुनः ऐकायास कां इच्छितां ? तुम्हीही त्याचे शिष्य व्हायास इच्छितां काय ? २८ तेव्हां त्यांनीं त्याची अशी निंदा केली कीं तूं त्याचा शिष्य आहेस; आम्ही मोशयाचे शिष्य आहों. २९ देव मोशयाशीं बोलला आहे हें आम्हांस ठाऊक आहे, हा तर कोठला आहे हें ठाऊक नाहीं. ३० त्या मनुष्यानें उत्तर दिलें कीं, हेंच तर मोठें आश्चर्य आहे कीं तो कोठला आहे हें तुम्हांस ठाऊक नाहीं, आणि त्यानें तर माझे डोळे उघडिले. ३१ आम्हांस तर ठाऊक आहे कीं, देव पाप्यांचें ऐकत नाहीं; तर जो कोणी देवाचा भक्त असून त्याच्या इच्छेप्रमाणें वर्ततो त्याचें तो ऐकतो. ३२ जन्मांधांचे डोळे कोणीं उघडिले, असें युगाच्या आरंभापासून कधीं ऐकण्यांत आलें नाहीं. ३३ हा देवापासून नसता तर त्याच्यानें कांहीं करवलें नसतें. ३४ त्यांनीं त्याला म्हटलें, तूं केवळ पापांत जन्मलास आणि आम्हांस शिकवितोस काय ? मग त्यांनीं त्याला बाहेर घालविलें.

३५ त्यांनीं त्याला बाहेर घालविलें हें येशूनें ऐकिलें; आणि तो आढळल्यावर त्यानें त्याला म्हटलें, तूं देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवितोस काय ?

३६ त्यानें उत्तर दिलें कीं, हे प्रभू, मी त्यावर विश्वास ठेवावा, तो कोण आहे ? ३७ येशूनें त्याला म्हटलें, तूं त्याला पाहिलें आहे व तुजशीं आतां बोलत आहे तोच तो आहे. ३८ तो म्हणाला, हे प्रभू, मी विश्वास ठेवितों; आणि त्यानें त्याला नमन केलें. ३९ तेव्हां येशू म्हणाला, मीं न्यायासाठीं या जगांत आलों, ज्यांस दिसत नाहीं त्यांस दिसावें; आणि ज्यांस दिसतें त्यांनीं अंधळें व्हावें. ४० परूशांतील जे त्याजवळ होते त्यांनीं हें ऐकून त्याला म्हटलें, आम्हीही अंधळे आहों काय ? ४१ येशू त्यांस म्हणाला, तुम्ही अंधळे असतां तर तुम्हांला पाप नसतें, परंतु आह्मांस दिसतें असें तुह्मी आतां ह्मणतां; ह्मणून तुमचें पाप राहतें.

१० मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों, जो मेंढवाड्यांत दारानें आंत न जातां दुसरीकडून चढून जातो तो चोर व लुटारू आहे. २ जो दारानें आंत जातो तो मेंढरांचा राखणारा आहे; ३ त्याला द्वारपाळ दार उघडितो; व मेंढरें त्याची वाणी ऐकतात, आणि तो आपल्या मेंढरांस त्याच्या त्याच्या नांवानें हाक मारितो, व त्यांस बाहेर नेतो. ४ आपलीं सर्व मेंढरें बाहेर काढिल्यावर तो त्यांच्या पुढें चालतो, व मेंढरें त्याच्या मागून चालतात, कारण तीं त्याची वाणी ओळखतात. ५ तीं परक्याच्या मागून जाणार नाहींत, तर त्यापासून पळतील, कारण तीं परक्यांची वाणी ओळखत नाहींत. ६ हा दृष्टांत येशूनें त्यांस सांगितला, तरी ज्या गोष्टी तो त्यांशीं बोलला त्या काय आहेत हें ते समजले नाहींत.

७ यास्तव येशू त्यांस पुनः ह्मणाला, मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों कीं, मी मेंढरांचें दार आहें. ८ जे माझ्यापूर्वी आले ते सर्व चोर व लुटारू आहेत, त्यांचें मेंढरांनीं ऐकिलें नाहीं. ९ मी दार आहें, जर कोणी मजकडून आंत जाईल तर तो तारण पावेल, आणि तो आंत येईल व बाहेर जाईल, आणि त्याला चारा मिळेल. १० चोर केवळ चोरी व घात व नाश करावा याच हेतूनें येतो; मी त्यांनीं जीवन पावावें व तें त्यांस विपुल असावें म्हणून आलों आहें. ११ मी उत्तम मेषपाल आहें, उत्तम मेषपाल मेंढरांकरितां आपला जीव देतो. १२ जो मेषपाल नव्हे व ज्यांचीं स्वतांचीं मेंढरें नव्हत असा जो

मोलकरी तो लांडगा येतां पाहून मेंढरें सोडून पळून जातो, आणि लांडगा त्यांवर झडप घालून त्यांची दाणादाण करितो. १३ मोलकरी पळून जातो, कारण तो मोलकरीच आहे, त्याला मेंढरांची काळजी नाहीं. १४, १५ मी उत्तम मेषपाल आहें, आणि जसा बाप मला जाणतो व मी बापाला जाणतों तसा जे माझे आहेत त्यांस मी जाणतों, व जे माझे आहेत ते मला जाणतात; आणि मेंढरांसाठीं मी आपला जीव देतों. १६ आणि या मेंढवाडयांतलीं नव्हत अशीं माझीं दुसरीं मेंढरें आहेत; तींही मला नेलीं पाहिजेत. आणि तीं माझी वाणी ऐकतील; आणि एक कळप एक मेषपाल असें होईल. १७ परत घेण्याकरितां मी आपला जीव देतों, यास्तव बाप मजवर प्रीति करितो. १८ तो कोणी मजपासून घेत नाहीं, तर मी होऊनच तो देतों; मला तो देण्याचा अधिकार आहे; व तो परत घेण्याचाही अधिकार आहे. ही आज्ञा मला माझ्या बापापासून प्राप्त झाली आहे.

१९ या शब्दावरून यहूद्यांत पुनः फूट पडली. २० त्यांतील बहुतेक म्हणाले, त्याला भूत लागलें आहे व तो वेडा आहे, त्याचें तुह्मी कां ऐकतां? २१ दुसरे म्हणाले, हीं वचनें भूतग्रस्ताचीं नव्हत, भूताला अंधळ्याचें डोळे उघडतां येतात काय?

२२ यरूशलेमेंत पुनः स्थापनाचा सण होता, हिंवाळा होता २३ आणि येशू देवळामध्यें शलमोनाच्या देवडींत फिरत होता. २४ यास्तव यहूद्यांनीं त्याला वेढून म्हटलें, तूं कोठवर आमचा जीव संशयांत ठेवतोस? तूं ख्रिस्त असलास तर आम्हांस उघड सांग. २५ येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, मी तुह्मांस सांगितलें तरी तुह्मी विश्वास धरीत नाहीं; जीं कृत्यें मी आपल्या बापाच्या नांवानें करितों तीं मजविषयीं साक्ष देतात. २६ तरी तुम्ही विश्वास धरीत नाहीं; कारण तुम्ही माझ्या मेंढरांतले नाहीं. २७ माझीं मेंढरें माझी वाणी ऐकतात, आणि मी त्यांस ओळखितों व तीं माझ्या मागून येतात. २८ आणि मी त्यांस सार्वकालिक जीवन देतों; व तीं कधींही नाश पावणार नाहींत, आणि कोणीं त्यांस माझ्या हातांहून हिसकून घेणार नाहीं. २९ ज्यानें तीं मला दिलीं तो माझा बाप सर्वांहून मोठा आहे; आणि बापाच्या हातांतून त्यांस कोणाच्याही

हिसकून घेववत नाहीं. ३० मी आणि बाप एक आहों. ३१ तेव्हां यहूद्यांनीं त्याला धोंडमार करायास पुनः धोंडे उचलिले; ३२ येशूनें त्यांस ह्मटलें, मीं बापाचीं बहुत चांगलीं कृत्यें तुम्हांस दाखविलीं आहेत, त्यांतून कोणत्या कृत्यामुळें तुम्ही मला धोंडमार करितां? ३३ यहूद्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, चांगल्या कृत्यासाठीं आम्ही तुला धोंडमार करीत नाहीं, तर दुर्भाषणासाठीं; व तूं मनुष्य असून आपणाला देव केलें यासाठीं. ३४ येशूनें त्यांस ह्मटलें कीं; " तुह्मीं देव आहां असें मी ह्मणालों " हें तुमच्या शास्त्रांत लिहिलें नाहीं काय? ३५ ज्यांस देवाचें वचन प्राप्त झालें त्यांस त्यानें देव ह्मटलें, (आणि शास्त्रलेखाचा भंग होत नाहीं) ३६ तर ज्याला बापानें पवित्रकार्यास नेमून जगांत पाठविलें त्या मी, देवाचा पुत्र आहें, असें ह्मटल्यावरून, तूं दुर्भाषण करितोस असें तुह्मी ह्मणतां काय? ३७ जर मी आपल्या बापाचीं कृत्यें करीत नाहीं, तर माझा विश्वास धरूं नका. ३८ परंतु जर मी करितों, तर माझा विश्वास न धरिला तरी कृत्यांचा विश्वास धरा; यासाठीं कीं मजमध्यें बाप व बापामध्यें मी असें तुह्मी जाणावें, व जाणून राहावें. ३९ ते त्याला पुनः धरायास पाहूं लागले, परंतु तो त्यांच्या हातून निघून गेला.

४० आणि तो पुनः यर्देनेच्या पलीकडे, योहान पहिल्यानें बाप्तिस्मा करीत असे त्या ठिकाणीं गेला व तेथें राहिला.

४१ तेव्हां त्याकडे बहुत लोक आले, व ते ह्मणाले कीं योहानानें कांहीं अद्भुत केलें नाहीं खरें, तरी योहानानें याविषयीं जें कांहीं सांगितलें तें सर्व खरें आहे. ४२ तेथें बहुत लोकांनीं त्यावर विश्वास ठेविला.

११ आतां मरीया व तिची बहीण मार्था यांच्या बेथानी गांवांतला लाजर नामें एक मनुष्य रोगी होता. २ ज्या मरीयेनें प्रभूला सुगंधि तेल लाविलें व त्याचे चरण आपल्या केसांनीं पुसले, तिचा हा रोगी लाजर भाऊ होता. ३ यास्तव त्या बहिणींनीं त्याला सांगून पाठविलें कीं, हे प्रभू, ज्यावर तूं प्रीति करितोस तो रोगी आहे. ४ तें ऐकून येशू ह्मणाला, हा रोग मरणासाठीं नव्हे, तर देवाच्या गौरवार्थ ह्मणजे याकडून देवाच्या पुत्राचें गौरव व्हावें यासाठीं आहे. ५ मार्था व तिची बहीण व लाजर यांवर येशू प्रीति करीत असे. ६ यास्तव तो

रोगी आहे हें ऐकिलें तरी तो होता त्या ठिकाणींच आणखी दोन दिवा
राहिला. ७ त्यानंतर त्यानें शिष्यांस ह्मटलें आपण पुनः यहूदीयेंत जाऊं
८ शिष्य त्याला ह्मणाले, गुरुजी, यहूदी नुक्तेच तुला धोंडमार करावया
पहात होते, आणि तूं पुनः तेथें जातोस काय? ९ येशूनें उत्तर दि
कीं, दिवसाचे बारा तास आहेत कीं नाहींत? कोणी दिवसास चाल
तर त्याला ठेंच लागत नाहीं, कारण तो या जगाचा उजेड पाहतो. १
परंतु कोणी रात्रीस चालतो तर त्याला ठेंच लागते, कारण त्यांत उजे
नाहीं. ११ त्यानें या गोष्टी सांगितल्यानंतर त्यांस ह्मटलें, आपला मि
लाजर निजला आहे, तर मी त्याला झोंपेंतून उठवायास जातों. १
यावरून शिष्य त्याला ह्मणाले, हे प्रभू, त्याला झोंप लागली असली त
तो पार पडेल. १३ येशू तर त्याच्या मरणाविषयीं बोलला, परंतु
झोंपेच्या निजण्याविषयीं बोलतो असें त्यांस वाटलें. १४ यास्तव येशू
त्यांस उघड सांगितलें, लाजर मेला आहे; १५ आणि मी तेथें नव्ह
ह्मणून तुह्मांसाठीं आनंद करितों, यासाठीं कीं तुह्मीं विश्वास धरावा; त
आपण त्याकडे जाऊं. १६ तेव्हां दिदुम ह्मटलेला थोमा आपल्या गु
बंधूंस ह्मणाला, आपणही याच्या बरोबर मरायास जाऊं.

१७ येशू आला तेव्हां त्याला कळलें कीं त्याला कबरेंत ठेवून च
दिवस झाले. १८ बेथानी यरूशलेमेजवळ सुमारें पाऊण कोसा
होती; १९ तेथें मार्था व मरीया यांचें भावाविषयीं सांत्वन करण्या
यहूद्यांतील बहुत लोक त्यांच्याकडे आले होते. २० येशू येत अ
हें ऐकतांच मार्था त्याला जाऊन भेटली, मरीया तर घरांत बसून राहिल
२१ मार्था येशूला ह्मणाली, हे प्रभू, तूं येथें असतास तर माझा भा
मेला नसता. २२ तरी आतांही जें कांहीं तूं देवाजवळ मागशील
देव तुला देईल, हें मला ठाऊक आहे. २३ येशूनें तिला म्हटलें, तु
भाऊ पुन्हा उठेल. २४ मार्था त्याला ह्मणाली, तो शेवटल्या दिव
पुनरुत्थानांत पुन्हां उठेल हें मला ठाऊक आहे. २५ येशूनें ति
ह्मटलें, पुनरुत्थान व जीवन मी आहें; जो मजवर विश्वास ठेवितो
मेला असला तरी जगेल. २६ आणि जो जगतो व मजवर विश्व
ठेवितो तो कधींही मरणार नाहीं. याचा तूं विश्वास धरितेस काय

२७ ती त्याला ह्मणाली, होय प्रभू, जो जगांत येणारा देवाचा पुत्र ख्रिस्त तोच तूं आहेस, असा मीं विश्वास धरिला आहे. २८ असें बोलून ती निघून गेली व आपली बहीण मरीया इला गुप्तपणें बोलावून ह्मणाली, गुरु आला आहे, तो तुला बोलावितो. २९ हें ऐकतांच ती त्वरेनें उठून त्याकडे आली. ३० (येशू अद्यापि गांवांत आला नव्हता, मार्था त्याला भेटली त्या ठिकाणींच होता) ३१ यास्तव जे यहूदी मरीयेच्या जवळ घरांत होते व तिचें सांत्वन करीत होते, त्यांनीं ती लवकर उठून बाहेर गेली असें पाहिल्यावर ती कबरेकडे रडायास जात आहे असें समजून ते तिच्या मागून चालले. ३२ येशू होता तेथें मरीया आल्यावर त्याला पाहून त्याच्या पायां पडली व त्याला ह्मणाली, हे प्रभू, तूं येथें असतास तर माझा भाऊ मेला नसता. ३३ येशू तिला रडतां पाहून व तिच्या संगतीं आलेल्या यहूद्यांलाही रडतां पाहून आत्म्यांत खवळला व विव्हळ झाला; ३४ आणि ह्मणाला तुम्हीं त्याला कोठें ठेविलें आहे ? ते त्याला ह्मणाले, हे प्रभू, येऊन पाहा. ३५ येशू रडला. ३६ यावरून यहूदी ह्मणाले, याची त्यावर केवढी प्रीति होती ! ३७ परंतु त्यांतील कित्येक ह्मणाले, ज्यानें अंधळ्याचे डोळे उघडिले त्याला हा मरूं नये असेंही करण्याची शक्ति नव्हती काय ? ३८ येशू पुनः मनांत खवळून कबरेकडे आला, ती गुहा होती, आणि तिच्या तोंडावर धोंड ठेविलेली होती. ३९ येशूनें ह्मटलें, धोंड काढा. त्या मेलेल्याची बहीण मार्था त्याला ह्मणाली, हे प्रभू, आतां त्याला धाण येत असेल, कारण त्याला चार दिवस झाले आहेत. ४० येशूनें तिला ह्मटलें, तूं विश्वास धरशील तर देवाचें गौरव पाहशील, असें मी तुला सांगितलें नाहीं काय ? ४१ यावरून त्यांनीं धोंड काढिली, तेव्हां येशूनें दृष्टि वर करून ह्मटलें, हे बापा, तूं माझें ऐकिलें ह्मणून मी तुझा उपकार मानितों. ४२ आणि तूं सर्वदा माझें ऐकतोस हें मी जाणलें, तरी जो लोकसमुदाय सभोंवता उभा आहे त्याकरितां बोललों, यासाठीं कीं तूं मला पाठविलें आहे असा त्यांनीं विश्वास धरावा. ४३ असें बोलून त्यानें मोठ्यानें हांक मारिली, लाजरा, बाहेर ये. ४४ जो मेला होता तो बाहेर आला, त्याचे हात पाय प्रेतवस्त्रांनीं बांधलेले व तोंड रुमालानें वेष्टिलेलें होतें. येशूनें त्यांस ह्मटलें त्याला मोकळा करा व जाऊं द्या.

४५ जे यहुदी मरीयेकडे आले व ज्यांनीं त्यानें जें केलें तें पाहिलें त्यांपैकीं बहुतांनीं त्यावर विश्वास ठेविला.

४६ त्यांपैकीं कित्येकांनीं परूश्यांकडे जाऊन येशूनें जें केलें तें त्यांस सांगितलें.

४७ यावरून मुख्य याजकांनीं व परूश्यांनीं सभा मिळवून म्हटलें आपण काय करावें? कारण तो मनुष्य बहुत अद्भुतें करितो. ४८ आपण त्याला असेंच सोडिलें तर सर्व लोक त्यावर विश्वास ठेवतील आणि रोमी येऊन आमचें स्थान व राष्ट्रही घेतील. ४९ तेव्हां त्यांपैकी कयफा नांवाचा कोणी एक त्या वर्षीं प्रमुख याजक होता तो त्यांस म्हणाला, तुह्मी कांहींच जाणत नाहीं, ५० आणि हेंहि लक्षांत आणीत नाहीं, कीं प्रजेसाठीं एका मनुष्यानें मरावें आणि सर्व राष्ट्राचा नाश होऊ नये हें तुम्हांस हितावह आहे. ५१ हें तर तो आपल्या आपण बोलला नाहीं, तर त्या वर्षीं तो प्रमुख याजक होता ह्मणून त्यानें प्रवचन सांगितलें कीं, येशू त्या राष्ट्राकरितां मरणार आहे; ५२ आणि केवळ त्या राष्ट्राकरितां असें नाहीं, तर यासाठीं कीं त्यानें देवाच्या पांगलेल्या लेकरांस सही जमवून एकत्र करावें. ५३ यावरून त्या दिवसापासन त्यांनीं त्याला जिवें मारण्याचा निश्चय केला.

५४ यास्तव येशू तेव्हांपासून यहूद्यांमध्यें प्रगटपणें फिरला नाहीं, तर तेथून रानाजवळच्या प्रांतांतील एफ्रईम नामें नगरांत गेला, आणि तें आपल्या शिष्यांसुद्धां राहिला.

५५ तेव्हां यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला होता, आणि बहुत लोक वल्हांडणाच्या अगोदर आपणांस शुद्ध करायास बाहेर गांवांहून यरूशलेमेस गेले. ५६ त्यांनीं येशूचा शोध केला; आणि देवळांत उभे असतांना एकमेकांस म्हटलें, तुम्हांस कसें वाटतें? तो सणास येणार नाहीं काय? ५७ मुख्य याजकांनीं व परूश्यांनीं तर त्याला धरावें ह्मणून अशी ताकीद केली होती कीं, तो कोठें आहे हें जर कोणास कळलें तर त्यानें खबर द्यावी.

१२ मग येशू वल्हांडणाच्या पूर्वी साहा दिवस बेथानीस आला; ज्या लाजराला येशूनें मेलेल्यांतून उठविलें तो तेथें होता. २ तेथें त्यांनीं त्यासाठीं जेवणावळ केली, तेव्हां मार्था सेवा करीत होती, आणि लाजर त्यांच्या पंक्तीस बसणाऱ्यांपैकीं एक होता. ३ तेव्हां मरीयेनें अर्ध शेर शुद्ध जटामांसीचें मोलवान सुगंधि तेल घेवून येशूच्या चरणांस लाविलें, आणि आपल्या केसांनीं त्याचे चरण पुसले आणि त्या सुगंधि तेलाच्या वासानें घर भरून गेलें. ४ त्याच्या शिष्यांतील एक जो यहुदा इस्कर्योत त्याला धरून देणार होता, तो म्हणाला, ५ हें सुगंधि तेल पाऊणशें रुपयांस विकून गरिबांस कां दिलें नाहीं? ६ त्याला गरिबांची काळजी होती म्हणून तो हें म्हणाला असें नाहीं, तर तो चोर होता व त्याच्याजवळ डबी होती, तींत जें घालीत तें तो चोरून घेत असे म्हणून असें म्हणाला. ७ यावरून येशूनें म्हटलें माझ्या उत्तरकार्याच्या दिवसासाठीं तें तिला ठेवूं द्या. ८ कारण गरीब नेहमीं तुम्हांजवळ आहेत, परंतु मी तुम्हांजवळ नेहमीं आहें असें नाहीं.

९ तो तेथें आहे असें यहूद्यांतील साधारण लोकांपैकीं पुष्कळांस कळलें, आणि केवळ येशूकरितांच नाहीं, तर ज्या लाजराला त्यानें मेलेल्यांतून उठविलें त्यालाही पाहण्याकरितां ते आले. १० मुख्य याजकांनीं तर लाजरालाही जिवें मारण्याचा निश्चय केला. ११ कारण त्यामुळें बहुत यहूद्यांनीं जाऊन येशूवर विश्वास ठेविला.

१२ दुसऱ्या दिवशीं सणास आलेला मोठा समुदाय येशू यरूशलेमेस येत आहे असें ऐकून, १३ खजुरीच्या झावळ्या घेऊन त्याच्या भेटीस बाहेर निघाला, आणि गजर करून म्हणाला कीं "होसान्ना, जो प्रभूच्या नांवानें येतो," तो इस्राएलाचा राजा, "धन्यवादित असो." १४ येशूला लहान गाढव मिळाल्यावर त्यावर तो बसला; हें लिहिल्याप्रमाणें घडलें, तें असें कीं, १५ "हे सीयोनेच्या कन्ये, भिऊं नको, पाहा, तुझा राजा गाढवीच्या शिंगरावर बसून येतो." १६ या गोष्टी त्याचे शिष्य प्रथम समजले नव्हते, तर येशूचें गौरव झाल्यावर त्यांस आठवण झाली कीं, त्याविषयीं या गोष्टी लिहिल्या होत्या आणि त्याप्रमाणें लोकांनीं त्याला केलें. १७ यास्तव, यानें लाजराला कबरेंतून बोलावून मेलेल्यां-

तून उठविलें, त्या वेळेस जो लोकसमुदाय त्याबरोबर होता त्यानें सा
दिली. १८ ह्यावरूनही समुदाय त्याला भेटायास गेले, कारण त्या
हें अद्भुत केलें होतें हें त्यांनीं ऐकिलें. १९ यास्तव परूशी एकमेकांस म्ह
णाले, तुमचें कांहीं चालत नाहीं हें लक्षांत आणा, पाहा, जग त्याच्या
मागून चाललें आहे.

२० लोक सणांत उपासना करावयास आले होते त्यांपैकीं कोणी हेल्लेण
होते, २१ त्यांनीं गालीलांतील बेथ्सैदाकर फिलिप याजवळ येऊन
विनंति केली कीं, महाराज, येशूला भेटावें असें आमच्या मनांत आहे
२२ फिलिपानें येऊन अंद्रियाला सांगितलें, आणि अंद्रिया व फिलि
यांनीं येऊन येशूला सांगितलें. २३ येशूनें त्यांस म्हटलें, मनुष्याच्य
पुत्राचें गौरव होण्याची वेळ आली आहे. २४ मी तुम्हांस खचीत खचीं
सांगतों, गव्हांचा दाणा जमिनींत पडून मेला नाहीं तर तो एकटा
राहतो, आणि मेला तर बहुत पीक देतो. २५ जो आपल्या जीवाव
प्रीति करितो तो त्याला मुकेल, आणि जो या जगांत आपल्या जीवाच्य
द्वेष करितो तो त्याचें सर्वकालिक जीवनासाठीं रक्षण करील. २६ ज
कोणी माझी सेवा करील तर त्यानें मला अनुसरावें म्हणजे जेथें मी आ
तेथें माझा सेवकही असेल. जर कोणी माझी सेवा करील तर बाप त्याच्य
मान करील. २७ आतां माझा जीव व्याकुळ झाला आहे, आणि म
काय बोलूं ? हे बापा, या घटकेपासून माझें रक्षण कर. तरी मी या
साठींच या घटकेंत आलों आहें. २८ हे बापा, तूं आपल्या नामा
गौरव कर. तेव्हां अशी आकाशवाणी झाली कीं, मी तें गौरविलें आहे
आणि पुनःही गौरवीन. २९ तेव्हां जे लोक उभे राहून ऐकत होते
म्हणाले, गर्जना झाली; दुसरे म्हणाले, त्याशीं दूत बोलला. ३० येशू
उत्तर दिलें कीं, ही वाणी मजसाठीं नाहीं तर तुम्हांसाठीं झाली. ३१ आत
या जगाचा न्याय होतो, आतां या जगाचा अधिकारी बाहेर टाकिला जाईल
३२ आणि मला पृथ्वीपासून उंच केलें तर मी आपणांकडे सर्वांस ओ
ढीन. ३३ आपण कोणत्या मरणानें मरणार हें सुचविण्याकरितां त
असें बोलला. ३४ यास्तव लोकांनीं त्याला उत्तर दिलें कीं, ख्रिस्त सर्व
काळ राहील असें आम्हीं नियमशास्त्रांतून ऐकिलें आहे तर मनुष्याच्य

पुत्राला उंच केलें पाहिजे असें तूं कसें ह्मणतोस ? हा मनुष्याचा पुत्र आहे तरी कोण ? ३५ यावरून येशूनें त्यांस ह्मटलें, आणखी थोडा वेळ तुह्मां मध्यें उजेड आहे. तुम्हांस अंधारानें गांठूं नये ह्मणून तुम्हांस उजेड आहे तोंपर्यंत चाला, कारण जो अंधारांत चालतो त्याला आपण कोठें जातों हें कळत नाहीं. ३६ तुह्मी उजेडाचे पुत्र व्हावें ह्मणून तुम्हांस उजेड आहे तोंपर्यंत उजेडावर विश्वास ठेवा.

येशू या गोष्टी बोलला, आणि निघून जाऊन त्यांपासून गुप्त राहिला. ३७ त्यानें त्यांच्या समोर इतकीं अद्भुतें केलीं असतांही यांनीं त्यावर विश्वास ठेविला नाहीं; ३८ यासाठीं कीं, यशया प्रवक्त्यानें जी गोष्ट सांगितली होती ती पूर्ण व्हावी. ती अशी कीं, " प्रभू, आमची वार्ता कोणी विश्वासली आहे ? आणि प्रभूचा बाहू कोणाला प्रगट झाला आहे ?" ३९ यामुळें त्यांच्यानें विश्वास ठेववेना, कां तर यशया अणखी ह्मणाला कीं,

४० " त्यांनीं डोळ्यांनीं पाहूं नये व अंतःकरणानें समजूं नये व फिरूं नये व मी त्यांस बरें करूं नये, ह्मणून त्यानें त्याचे डोळे अंधळे केले व त्याचें अंतःकरण कठिण केलें आहे. " ४१ यशयानें त्याचें गौरव पाहिलें, ह्मणून हें सांगितलें; आणि त्याविषयीं तो बोलला. ४२ तथापि अधिकाऱ्यांतूनही बहुतांनीं त्यावर विश्वास ठेविला, परंतु आपण सभाबहिष्कृत होऊं नये ह्मणून परूश्यांमुळें त्यांनीं हें कबूल केलें नाहीं. ४३ कारण त्यांस देवाकडील गौरवापेक्षां मनुष्याकडील गौरव अधिक आवडलें.

४४ तेव्हां येशू उच्चस्वरानें ह्मणाला, जो मजवर विश्वास ठेवितो तो मजवर विश्वास ठेवीत नाहीं, तर ज्यानें मला पाठविलें त्यावर विश्वास ठेवितो. ४५ आणि जो मला पाहतो तो ज्यानें मला पाठविलें त्याला पाहतो. ४६ मी जगांत प्रकाश असा आलों आहें, यासाठीं कीं मजवर विश्वास ठेवणाऱ्या कोणीही अंधारांत राहूं नये. ४७ माझीं वचनें ऐकून पाळीत नाहीं त्याचा न्याय मी करीत नाहीं: कारण मी जगाचा न्याय करण्यासाठीं नाहीं, तर जगाचें तारण करण्यासाठीं आलों. ४८ जो मला अव्हेरितो व माझीं वचनें अंगिकारित नाहीं, त्याचा न्याय करणारा कोणी एक आहे; जें वचन मीं सांगितलें तेंच शेवटल्या दिवशीं त्याचा न्याय

करील. ४९ कारण मी आपल्या आपण बोललों नाहीं; तर
काय सांगावें व काय बोलावें याविषयीं ज्या बापानें मला पाठवि
त्यानेंच मला आज्ञा दिली आहे. ५० आणि त्याची आज्ञा सार्वकालि
जीवन आहे हें मला ठाऊक आहे; यास्तव जें कांहीं मी बोलतों
बापानें मला सांगितल्याप्रमाणें बोलतों.

१३ वल्हांडण सणापूर्वी, या जगांतून बापाकडे जाण्याची आपली वे
आली हें जाणून, येशूनें आपले जे जगांत होते त्यांवर प्री
केली ती शेवटपर्यंत केली. २ भोजन होते वेळेस शिमोनाचा पुत्र यहु
इस्कर्योत याच्या मनांत त्याला धरून द्यावें असें सैतान घालून चुक
असतां, ८ आपल्या हातीं बापानें अवघें दिलें आहे, आणि आपण देव
पासून आलों व देवाकडे जातों हें जाणून, ४ येशू भोजनावरून उठ
आणि त्यानें आपलीं बाह्य वस्त्रें काढून ठेविलीं; व रुमाल घेऊन कमरेस
धिला. ५ मग तो गंगाळांत पाणी ओतून शिष्यांचे पाय धुऊं लागल
आणि कमरेस बांधलेल्या रुमालानें ते पुसूं लागला. ६ तो शिमोन पेत्र
कडे आला, तेव्हां तो त्याला म्हणाला, हे प्रभू, तूं माझे पाय धुतो
काय? ७ येशूनें त्याला उत्तर दिलें कीं, जें मी करितों तें तूं आतां जाण
नाहींस; पुढें जाणशील. ८ पेत्र त्याला म्हणाला, तुला माझे प
कधींहि धुवावयाचे नाहींत. येशूनें त्याला उत्तर दिलें कीं मीं जर तु
धुतलें नाहीं तर माझ्या बरोबर तुला वांटा नाहीं. ९ शिमोन पेत्र त्या
म्हणाला, हे प्रभू, नुसते माझे पाय धुऊं नको, तर हात व डोकेंही
१० येशूनें त्याला म्हटलें, ज्याचें स्नान झालें आहे त्याला पायांखेरीज दु
धुण्याची गरज नाहीं, तो तर सर्वांगीं शुद्ध आहे; आणि तुम्ही शुद्ध आ
तरी सर्वच नाहीं. ११ कारण आपणास धरून देणारा त्याला ठाऊ
होता; यास्तव तो म्हणाला, तुम्ही सर्वच शुद्ध नाहीं.

१२ मग त्यांचे पाय धुतल्यावर व आपलीं वस्त्रें लेऊन पुनः बसल्
वर त्यानें त्यांस म्हटलें मी तुम्हांस काय केलें हें तुम्ही समजलां का
१३ तुम्ही मला गुरु व प्रभु असें संबोधन देतां, आणि तें ठीक दे
कारण मी तसाच आहें. १४ यास्तव जो मी प्रभु व गुरु त्या मी तु

पाय धुतले तर तुह्मीही एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत. १५ कारण जसें मी तुह्मांस केलें तसें तुह्मींही करावें म्हणून तुम्हांस कित्ता घालून दिला आहे. १६ मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों, दास आपल्या धन्यापेक्षां थोर नाहीं; आणि पाठविलेला पाठविणाऱ्यापेक्षां थोर नाहीं. १७ या गोष्टी तुह्मीं जाणतां त्या केल्या तर तुह्मी धन्य आहां. १८ मी तुम्हां सर्वांविषयीं बोलत नाहीं, जे मीं निवडिले ते मला ठाऊक आहेत, तरी "जो माझी भाकरी खातो त्यानें मजवर आपली टांच उचलिली आहे," असा जो शास्त्रलेख तो पूर्ण झाला पाहिजे. १९ हें होण्यापूर्वी आतां मी तुम्हांस सांगतों, यासाठीं कीं जेव्हां तें होईल तेव्हां तुह्मी विश्वास धरावा कीं, मी तो आहें, २० मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों कीं, ज्या कोणाला मी पाठवितों त्याला जो अंगीकारितो तो मला अंगीकारितो; आणि जो मला अंगीकारितो, तो ज्यानें मला पाठविलें त्याला अंगीकारितो.

२१ असें बोलल्यावर येशू आत्म्यांत व्याकुळ झाला व प्रतिज्ञापूर्वक म्हणाला, मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों कीं, तुम्हांतील एक मला धरून देईल. २२ तो कोणाविषयीं बोलतो असा संशय धरून शिष्य एकमेकांकडे पाहूं लागले. २३ तेव्हां ज्यावर येशूची प्रीति होती असा त्याच्या शिष्यांतील एक येशूच्या उराशीं टेंकलेला होता. २४ यास्तव ज्याविषयीं तो बोलतो तो कोण आहे हें आम्हांस सांग, असें शिमोन पेत्रानें त्याला खुणावून म्हटलें. २५ तेव्हां तो तसाच येशूच्या उराशीं टेंकलेला असतां मागें लवून त्याला म्हणाला. हे प्रभू, तो कोण आहे? २६ येशूनें उत्तर दिलें कीं, ज्याला मी घांस बुचकळून देईन तोच तो आहे. मग त्यानें घांस बुचकळून शिमोनाचा पुत्र यहूदा इस्कर्योत याला दिला. २७ आणि घांस दिल्यावर सैतान त्यामध्यें शिरला. मग येशूनें त्याला म्हटलें, जें तूं करितोस तें लवकर कर. २८ त्यानें त्याला असें कशासाठीं सांगितलें हें भोजनास बसलेल्यांतील कोणाला समजलें नाहीं. २९ यहूदाजवळ डबी होती, यास्तव सणासाठीं आपणास ज्या पदार्थांची गरज आहे ते विकत घ्यावे; किंवा गरीबांस कांहीं द्यावें म्हणून येशूनें सांगितलें असेल, असें कित्येकांस वाटलें. ३० मग घांस घेतल्यावर तो लागलाच बाहेर गेला. त्या वेळीं रात्र होती.

३१ तो बाहेर गेल्यावर येशूनें म्हटलें, आतां मनुष्याचा पुत्र गौ
विला आहे, आणि त्याच्या ठायीं देव गौरविला आहे; ३२ देव आपत
ठायीं त्याला गौरवील, आणि त्याला लवकर गौरवील. ३३ अ
मुलांनों, मी अजून थोडा वेळ तुम्हांबरोबर आहें, तुम्ही माझा श
कराल, आणि जसें मी यहूद्यांस सांगितलें कीं, जेथें मी जातों तेथें तु
च्यानें येववत नाहीं; तसें तें तुम्हांसही आतां सांगतों. ३४ मी तुम्ह
नवी आज्ञा देतों कीं, तुम्ही एकमेकांवर प्रीति करावी; जशी मी तुम
वर प्रीति केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीति करावी. ३५ तुम
एकमेकांवर प्रीति असली म्हणजे त्यावरून सर्व जाणतील कीं, तु
माझे शिष्य आहां.

३६ शिमोन पेत्र त्याला म्हणाला, हे प्रभू, तूं कोठें जातोस? येश
उत्तर दिलें कीं, जेथें मी जातों तेथें आतां तुझ्यानें माझ्या मागून येव
नाहीं, तरी मग येशील. ३७ पेत्र त्याला म्हणाला, हे प्रभू माझ्य
तुझ्या मागून आतांच कां येववत नाहीं? मी तुझ्यासाठीं आपला ज
देईन. ३८ येशूनें त्याला उत्तर दिलें कीं, माझ्यासाठीं तूं आपला ज
देशील काय? मी तुला खचीत खचीत सांगतों, तूं तीन वेळां मला
कारीस तोंपर्यंत कोंबडा आरवणार नाहीं.

१४ तुमचें अंतःकरण घाबरूं नये; देवावर विश्वास ठेवा आणि म
वरही विश्वास ठेवा. २ माझ्या बापाच्या घरांत राहण्या
जागा बहुत आहेत; नसत्या तर मीं तुम्हांस सांगितलें असतें; मीं तुम
साठीं जागा तयार करायास जातों. ३ आणि मीं जाऊन तुम्हांस
जागा तयार केली म्हणजे पुनः येऊन तुम्हांस माझ्या जवळ घेई
यासाठीं कीं, जेथें मी आहें तेथें तुम्हींही असावें. ४ मी जातों तिकड
मार्ग तुम्हांस ठाऊक आहे. ५ थोमा त्याला म्हणाला, हे प्रभु, तूं
जातोस हें आम्हांस ठाऊक नाहीं; मग आम्हांस मार्ग कसा ठाऊ
६ येशूनें त्याला म्हटलें, मार्ग व सत्य व जीवन मी आहें, माझ्या
आल्यावांचून बापापाशीं कोणी जात नाहीं. ७ तुम्हीं मला जाणी
असतें तर माझ्या बापालाही जाणिलें असतें; आतांपासून तुम्ही त्या
जाणतां व त्याला पाहिलें आहे. ८ फिलिप त्याला म्हणाला, हे प्र

बाप आम्हांला दाखीव, ह्मणजे आम्हास पुरे आहे. ९ येशूनें त्याला म्हटलें, फिलिपा, मी इतका काळ तुह्मांजवळ असतां तूं मला जाणत नाहींस काय? ज्यानें मला पाहिलें आहे त्यानें बापाला पाहिलें आहे; तर बाप आम्हांस दाखीव, हें तूं कसें ह्मणतोस? १० मी बापामध्यें व बाप मजमध्यें आहे असा विश्वास तूं धरीत नाहींस काय? ज्या गोष्टी मी तुह्मांस सगतों त्या मी आपल्याआपण सांगत नाहीं, तर मजमध्यें राहणारा बाप तो आपलीं कामें करितो. ११ मी बापामध्यें व बाप मजमध्यें असा माझा विश्वास धरा, नाहीं तर माझ्या कृत्यामुळेंच तरी मजवर विश्वास ठेवा. १२ मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों, मी जीं कृत्यें करितों तीं मजवर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यापेक्षां मोठींही करील, कारण मी बापाकडे जातों. १३ आणि तुह्मीं जें कांहीं माझ्या नांवानें मागाल तें मी करीन, यासाठीं कीं, बापानें पुत्राच्या ठायीं गौरव पावावें. १४ जर तुह्मी माझ्या नांवानें मजपाशीं कहीं मागाल तर मी तें करीन. १५ मजवर तुमची प्रीति असली तर माझ्या आज्ञा पाळाल. १६ आणि मी बापाला विनंति करीन, आणि तो तुह्मांस दुसरा कैवारी ह्मणजे सत्याचा आत्मा देईल; यासाठीं कीं त्यानें तुह्मांबरोबर सर्वकाळ राहावें. १७ त्याला जगाच्यानें ग्रहण करवत नाहीं, कारण ते त्याला पाहत नाहींत व त्याला जाणत नाहींत; तुह्मी त्याला जाणतां, कारण तो तुह्मांबरोबर राहतो व तुह्मांमध्यें असेल. १८ मी तुह्मांस अनाथ असे सोडणार नाहीं, तुह्मांकडे येईन. १९ आतां थोडाच वेळ आहे, मग जग मला आणखी पाहणार नाहीं; तरी तुह्मी मला पाहाल, कारण मी जगतों आणि तुह्मीही जगाल. २० त्या दिवशीं तुह्मी जाणाल कीं, मी आपल्या बापामध्यें व तुह्मी मजमध्यें व मी तुह्मांमध्यें आहें. २१ ज्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व त्या जो पाळितो तोच मजवर प्रीति करणारा आहे, आणि जो मजवर प्रीति करितो त्यावर बाप प्रीति करील, मीही त्याजवर प्रीति करीन व आपणाला त्याला प्रगट करीन. २२ यहूदा (इस्कर्योत नव्हे) त्याला म्हणाला, हे प्रभू, असें काय झालें कीं तूं आपणाला आह्मांस प्रगट करणार आणि जगाला प्रगट करणार नाहींस? २३ येशूनें त्याला उत्तर दिलें कीं, जर कोणी मजवर प्रीति करितो तर

तो माझें वचन पाळील, आणि माझा बाप त्यावर प्रीति करील, आणि आह्मी त्याकडे येऊन त्याबरोबर वस्ती करूं. २४ जो मजवर प्रीति करीत नाहीं तो माझीं वचनें पाळीत नाहीं; आणि जें वचन तुह्मी ऐकतां तें माझें नव्हे, तर ज्या बापानें मला पाठविलें त्याचें आहे.

२५ मी तुह्मांजवळ राहत असतांना तुह्मांस ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. २६ तरी ज्याला बाप माझ्या नांवानें पाठवील, तो कैवारी ह्मणजे पवित्र आत्मा तुह्मांस सर्व शिकवील, आणि ज्या गोष्टी मी तुह्मांस सांगितल्या त्या सर्वांची तुह्मांस आठवण देईल. २७ मी तुह्मांस शांति देऊन ठेवितों; आपली शांति तुह्मांस देतों, जसें जग देतें तसें मी तुह्मांस देत नाहीं. तुमचें अंतःकरण घाबरूं नये व भिऊं नये. २८ मी जातों आणि तुह्मांकडे येईन असें जें मी तुह्मांस सांगितलें तें तुह्मीं ऐकिलें. २९ जर तुमची प्रीति मजवर असती तर मी बापाकडे जातों ह्मणून तुह्मी आनंद पावलां असतां; कारण माझा बाप मजपेक्षां थोर आहे. ३० आणि तें होईल तेव्हां तुह्मीं विश्वास धरावा, ह्मणून तें होण्यापूर्वी मी आतां तुह्मांस सांगितलें आहे. यापुढें मी तुह्माशीं फार बोलणार नाहीं, कारण जगाचा अधिकारी येतो, तरी मजमध्यें त्याचें कांहीं नाहीं. ३१ परंतु मी बापावर प्रीति करितों, आणि बापानें जशी मला आज्ञा दिली तसें करितों, हें जगानें जाणावें ह्मणून असें होतें. उठा, आपण एथून जाऊं.

१५ १ मी खरा द्राक्षवेल आहें, आणि माझा बाप बागवान आहे. २ माझ्यांतील जो फांटा फळ देत नाहीं, त्या प्रत्येकाला तो काढून टाकितो; आणि जो फळ देतो त्यानें अधिक फळ द्यावें ह्मणून तो त्या प्रत्येकाला शुद्ध करितो. ३ जें वचन मीं तुह्मांस सांगितलें त्यामुळें तुह्मी आतां शुद्ध झालांच आहां. ४ तुह्मी मजमध्यें रहा, आणि मी तुह्मांमध्यें. जसें फांटा वेलांत राहिल्यावांचून त्याच्यानें आपल्याआपण फळ देववत नाहीं, तसें मजमध्यें राहिल्यावांचून तुमच्यानेंही देववत नाहीं. ५ मी वेल आहें, तुह्मी फांटे आहां, जो मजमध्यें राहतो आणि मी त्यामध्यें, तो बहुत फळ देतो; कारण मजपासून वेगळे असल्यानें तुमच्यानें कांहीं करवत नाहीं. ६ कोणी मजमध्यें राहिला नाहीं,

त्याला फांद्यांप्रमाणें बाहेर टाकितात व तो वाळून जातो; मग त्यांस गोळा करून अग्नींत टाकितात व ते जळून जातात. ७ तुह्मीं मजमध्यें राहिलां व माझीं वचनें तुह्मांमध्यें राहिलीं तर जें कांहीं तुह्मांस पाहिजे असेल तें मागा, ह्मणजे तें तुह्मांस प्राप्त होईल. ८ तुह्मी बहुत फळ द्यावें ह्मणजे त्यानें बापाचें गौरव होतें; आणि तुह्मी माझे शिष्य व्हाल. ९ जशी बापानें मजवर प्रीति केली तशी मीही तुम्हांवर प्रीति केली आहे, तुह्मी माझ्या प्रीतींत रहा. १० जसा मी आपल्या बापाच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतींत राहतों, तसे तुह्मी माझ्या आज्ञा पाळाल तर माझ्या प्रीतींत रहाल. ११ माझा आनंद तुम्हांमध्यें असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा, म्हणून मी तुम्हांस या गोष्टी सांगितल्या आहेत. १२ जशी मी तुह्मांवर प्रीति केली तशी तुम्हीं एकमेकांवर प्रीति करावी अशी माझी आज्ञा आहे. १३ आपल्या मित्रांकरितां आपला प्राण द्यावा यापेक्षां कोणाची प्रीति मोठी नाहीं. १४ मी तुम्हांस जें कांहीं सांगतों तें तुम्ही कराल तर तुम्ही माझे मित्र आहां. १५ मी आतांपासून तुम्हांस दास ह्मणत नाहीं; कारण धनी काय करितो तें दासाला ठाऊक नसतें; परंतु मी तुह्मांस मित्र ह्मटलें आहे; कारण जें कांहीं मी आपल्या बापापासून ऐकून घेतलें तें सर्व मी तुह्मांस कळविलें आहे. १६ तुह्मी मला निवडलें नाहीं, तर मीं तुह्मांस निवडिलें व तुह्मांस नेमिलें आहे; यासाठीं कीं, तुम्हीं जाऊन फळ द्यावें व तुमचें फळ रहावें; यासाठीं कीं जें कांहीं तुम्हीं माझ्या नांवानें बापापाशीं मागाल तें त्यानें तुम्हास द्यावें. १७ तुम्हीं एकमेकांवर प्रीति करावी म्हणून मी तुम्हांस ह्या आज्ञा करितों. १८ जग तुमचा द्वेष करितें तर तुमचा द्वेष केल्यापूर्वी त्यानें माझा केला हें तुम्हीं जाणतां. १९ तुम्हीं जगाचे असतां तर जगानें स्वकीयांवर प्रीति केली असती; परंतु तुम्हीं जगाचे नाहींत तर मीं तुम्हांस जगांतून निवडिलें आहे, म्हणून जग तुमचा द्वेष करितें. २० दास धन्यापेक्षां मोठा नाहीं असें जें वचन मीं तुम्हास सांगितलें त्याची आठवण करा. जर ते माझ्या पाठीस लागले तर तुमच्याही पाठीस लागतील; जर त्यांनीं माझें वचन पाळिलें तर तुमचेंही पाळितील. २१ परंतु, ते माझ्या नांवाकरितां हें सर्व तुम्हांला करितील, कारण तें ज्यानें

मला पाठविलें त्यास जाणत नाहींत. २२ मी आलों नसतों व त्यां
बोललों नसतों तर त्यांकडे पाप नसतें, परंतु आतां त्यांस आपल्या
पापाविषयीं सांगण्यास निमित्त नाहीं. २३ जो माझा द्वेष करितो
माझ्या बापाचाही द्वेष करितो. २४ जीं कामें दुसऱ्या कोणीं के
नाहींत तीं मी त्यांच्यामध्यें केलीं नसतीं तर त्यांकडे पाप नसतें, प
आतां त्यांनीं मला व माझ्या बापालाही पाहिलें व द्वेषिलेंही आहे.
तथापि "विनाकारण त्यांनीं माझा द्वेष केला" असें जें वचन त्यांच
शास्त्रांत लिहिलें आहे तें पूर्ण व्हावें म्हणून असें होतें. २६ परंतु जो
पापापासून निघतो, ज्याला मी बापापासून तुह्मांकडे पाठवीन असा
कैवारी ह्मणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हां तो मजविषयीं साक्ष देईल
२७ आणि तुह्मीही साक्ष द्याल, कारण आरंभापासून तुह्मी माझ्या संग
असत आलां आहां.

१६ तुह्मी अडखळूं नये ह्मणून मीं तुह्मांस या गोष्टी सांगितल्
आहेत. २ ते तुम्हांस सभाबहिष्कृत करितील; इतकेंच नाह
तर अशी वेळ येत आहे कीं, जो कोणी तुमचा जीव घेईल त्याला आप
देवाला सेवा अर्पण करितों असें वाटेल. ३ ते असें करितील, कार
त्यांनीं बापाला व मलाही जाणिलें नाहीं. ४ तर मीं तुह्मांस ह्या गो
अशासाठीं सांगितल्या कीं त्यांची वेळ आली ह्मणजे त्या मी तुह्मा
सांगितल्याची आठवण व्हावी. ह्या गोष्टी प्रारंभापासून तुह्मांस सांगितल
नाहींत, कारण मी तुह्मांबरोबर होतों. ५ परंतु ज्यानें मला पाठवि
त्याकडे मी आतां जातों; आणि कोठें जातोस, असें तुह्मांतील कोणी मा
पुसत नाहीं. ६ तरी या गोष्टी मी तुह्मांस सांगितल्या आहेत ह्मण
तुमचें अंतःकरण खेदानें भरलें आहे. ७ तथापि मी तुह्मांस खरी गो
सांगतों; मी जावें हें तुह्मांस हितकारक आहे, कारण मीं न गेलों
कैवारी तुह्मांकडे येणार नाहीं, मी गेलों तर त्याला तुह्मांकडे पाठवी
८ तो येऊन पापाविषयीं, व धार्मिकतेविषयीं, व न्यायाविषयीं जगा
खातरी करील; ९ पापाविषयीं, ते मजवर विश्वास ठेवीत नाहींत यह
रून; १० धार्मिकतेविषयीं, मी बापाकडे जातों आणि पुढें तुह्मांस
दिसणार नाहीं यावरून; ११ न्यायाविषयीं, या जगाच्या अधिकाऱ्या

न्याय केला आहे यावरून. १२ मला अद्यापि बहुत गोष्टी तुह्मांस सांगायाच्या आहेत, परंतु आतां तुमच्यानें त्या सोसवत नाहींत. १३ तरी तो ह्मणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हां तो तुम्हांस मार्ग दाखवून सर्व सत्यांत नेईल, कारण तो आपल्याआपण बोलणार नाहीं, तर जें कांहीं ऐकेल तेंच बोलेल, आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांस विदित करील. १४ तो माझें गौरव करील, कारण जें माझें आहे त्यांतून घेऊन तें तुह्मांस विदित करील. १५ जें कांहीं बापाचें आहे तें सर्व माझें आहे, ह्मणून मी ह्मणालों कीं, जें माझें आहे त्यांतून घेऊन तें तुम्हांस विदित करील. १६ थोडक्या वेळानें तुम्ही मला पाहणार नाहीं; आणि पुनः थोडक्या वेळानें मला पहाल. १७ यावरून त्याच्या शिष्यांपैकीं कित्येक एकमेकांस म्हणाले, हें काय आहे कीं तो आह्मांस ह्मणतो, थोडक्या वेळानें मी तुह्मास दिसणार नाहीं, आणि पुन्हा थोडक्या वेळानें तुह्मी मला पहाल; आणि, कारण मी बापाकडे जातों असें जें तो आह्मांस ह्मणतो तें काय? १८ ते म्हणाले, थोडक्या वेळानें असें जें हा ह्मणतो तें काय? तो काय म्हणतो हें आह्मांस समजत नाहीं. १९ आपणाला पुसावयास ते इच्छित आहेत, हें जाणून येशूनें त्यांस ह्मटलें थोडक्या वेळानें तुह्मी मला पाहणार नाहीं आणि पुनः थोडक्या वेळानें तुह्मी मला पहाल, हें जें मी ह्मणालों त्याविषयीं तुह्मी एकमेकांस विचारतां काय २० मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों कीं तुह्मी रडाल व शोक कराल, तरी जग आनंद करील; तुह्मी खेद पावाल, तरी तुमच्या खेदाचा आनंद होईल. २१ जेव्हां स्त्री प्रसूत होते तेव्हां तिला खेद होतो कारण तिची घटका आली परंतु बालक जन्मल्यावर मनुष्य जगांत जन्मल्याचा जो आनंद होतो त्यामुळें तिला त्या क्लेशाची आठवण होत नाहीं. २२ याप्रमाणें तुह्मांस आतां खेद झाला आहे तरी मी तुह्मांस पुनः पाहीन आणि तुमचें अंतःकरण आनंद पावेल, आणि तुमचा आनंद तुम्हांपासून कोणी काढून घेणार नाहीं. २३ त्या दिवशीं तुह्मी माझ्याजवळ कांहीं मागणार नाहीं. मी तुम्हांस खचीत खचीत सांगतों कीं, तुह्मी बापाजवळ कांहीं मागाल तर तें तो तुह्मांस माझ्या नांवानें देईल. २४ तुह्मीं अजून माझ्या नांवानें कांहीं मागितलें नाहीं. मागा ह्मणजे तुह्मांस मिळेल, यासाठीं कीं तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.

२५ या गोष्टी मी तुह्मांस दृष्टांतरूपानें सांगितल्या आहेत, मी तुह्मां
दृष्टांतरूपानें अणखी बोलणार नाहीं, तर बापाविषयीं तुह्मांस उघड सांगें
अशी घटका येत आहे. २६ त्या दिवशीं तुह्मी माझ्या नांवानें मागा
आणि मी तुह्मांसाठीं बापाजवळ विनंति करीन, असें मी तुह्मांस ह्मण
नाहीं; २७ बाप स्वतां तुह्मांवर प्रीति करितो, कारण तुह्मी मजवर प्री
केली आहे, आणि मी बापापासून आलों असा विश्वास धरिला आ
२८ मी बापापासून निघून जगांत आलों आहें; पुनः जग सोडून बाप
कडे जातों. २९ त्याचे शिष्य ह्मणाले, पहा, आतां तूं उघड बोलतोस
कांहीं दृष्टांत सांगत नाहींस. ३० आतां आह्मांस कळलें कीं तुला स
ठाऊक आहे, ह्मणून कोणीं तुझ्याजवळ मागावें अशी तुला गरज नाह
यावरून तूं देवापासून आलास असा आह्मी विश्वास धरितों. ३१ ये
शूनें त्यांस उत्तर दिलें कीं, आतां तुह्मी विश्वास धरितां काय? ३२ पह
अशी घटका येते, किंबहुना आली आहे कीं, दाणादाण होऊन तुह्मी स
आपापल्या घरीं जाल व मला एकटा सोडाल; तरी मी एकटा नाहीं
कारण बाप मजबरोबर आहे. ३३ या गोष्टी मी तुह्मांस अशासाठीं स
गितल्या आहेत कीं, माझ्याठायीं तुह्मीं शांति पावावी. जगांत तुह्मां
क्लेश होतील, तरी धीर धरा; मीं जगाला जिंकिलें आहे.

१७ या गोष्टी सांगितल्यावर येशूनें वर आकाशाकडे दृष्टि लावू
ह्मटलें, हे बापा, घटका आली आहे, पुत्रानें तुझें गौरव करा
ह्मणून आपल्या पुत्राचें गौरव कर. २ जे तूं त्याला दिले आहेस त्या सर्वां
त्यानें सार्वकालिक जीवन द्यावें यासाठीं मनुष्यमात्रावर त्याला अधिक
दिलाच आहे. ३ सार्वकालिक जीवन हेंच आहे कीं त्यांनीं जो तूं एकच सत
देव त्या तुला, व ज्याला तूं पाठविलें, त्या येशू खिस्ताला जाणावें. ४
काम तूं मला करायास दिलें तें समाप्त करून मीं तुला पृथ्वीवर गौर
विलें. ५ तर आतां हे बापा, जग होण्यापूर्वी जें माझें गौरव तुझ्या
जवळ होतें तें तूं आपणाजवळ माझें गौरव कर. ६ जे मनुष्यं जगांतू
तूं मला दिले, त्यांस मीं तुझें नांव प्रगट केलें, ते तुझे होते आणि
ते मला दिले, आणि त्यांनीं तुझें वचन पाळिलें आहे. ७ आतां
जाणतात कीं, जें कांहीं तूं मला दिलें आहे तें सर्व तुजपासून आहे.

कारण जीं वचनें तूं मला दिलीं तीं मीं त्यांस दिलीं आहेत आणि त्यांनीं तीं घेतलीं आणि मी तुजपासून आलों हें त्यांनीं खरोखर जाणिलें आणि तूं मला पाठविलें असा त्यांनीं विश्वास धरिला. ९ त्यासाठीं मी विनंति करितों, मी जगासाठीं विनंति करीत नाहीं तर जे तूं मला दिलें आहेस त्यांसाठीं, कारण ते तुझे आहेत. १० जें माझें तें सर्व तुझें आहे; आणि जें तुझें तें माझें आहे, आणि त्यांच्याठायीं मी गौरविला आहें. ११ यापुढें मी जगांत नाहीं, ते जगांत आहेत; मी तुजकडे येतों, हे पवित्र बापा, तूं मला दिलेल्या आपल्या नामांत त्यांस राख, यासाठीं कीं जसे आह्मी एक आहों तसें त्यांनीं एक व्हावें. १२ जोंपर्यंत मी त्यांबरोबर होतों तोंपर्यंत तूं मला दिलेल्या तुझ्या नामांत मीं त्यांस राखिलें, आणि मीं त्यांचा संभाळ केला, आणि नाशाच्या पुत्राशिवाय त्यांतून कोणी नाश पावला नाहीं, यासाठीं कीं शास्त्रलेख पूर्ण व्हावा. १३ पण आतां मी तुजकडे येतों आणि त्यांच्याठायीं माझा आनंद परिपूर्ण व्हावा ह्मणून मी जगांत या गोष्टी सांगतों. १४ मी तुझें वचन त्यांस दिलें आहे, आणि जगानें त्यांचा द्वेष केला, कारण जसा मी जगाचा नाहीं तसे तेही जगाचे नाहींत. १५ तूं त्यांस जगांतून काढून घ्यावें अशी मी विनंति करीत नाहीं, तर तूं त्यास वाइटापासून राखावें अशी विनंति करितों. १६ जसा मी जगाचा नाहीं तसे तेही जगाचे नाहींत. १७ तूं सत्यांत त्यांस पवित्र कर, तुझें वचन हेंच सत्य आहे. १८ जसें तूं मला जगांत पाठविलें तसें मीही त्यांस जगांत पाठविलें. १९ आणि मी त्यांच्यासाठीं आपणाला अर्पून पवित्र करितों, यासाठीं कीं, तेही खरे पवित्र व्हावे. २० मी त्यांच्यासाठीं केवळ नाहीं, तर त्यांच्या वचनावरून जे मजवर विश्वास ठेवितात त्यांच्यासाठींही विनंति करितों; २१ यासाठीं कीं ते सर्व एक व्हावे; हे बापा, जसा तूं मजमध्यें व मी तुजमध्यें तसे तेही आम्हांमध्यें व्हावे, यासाठीं कीं तूं मला पाठविलें असा विश्वास जगानें धरावा. २२ तूं जें गौरव मला दिलें आहे तें मी त्यांस दिलें आहे, यासाठीं कीं जसे आम्ही एक आहों तसे तेही एक व्हावे; २३ ह्मणजे मी त्यांमध्यें व तूं मजमध्यें; यासाठीं कीं ते एक होऊन पूर्ण व्हावे; आणि त्यावरून जगानें जाणावें कीं, तूं मला पाठविलें, आणि जशी तूं

मजवर प्रीति केली तशी त्यांवरही प्रीति केली. २४ हे बापा, मीं अ
इच्छितों कीं तूं जे मला दिलेले आहेत त्यांनींही जेथें मी आहें तेथें मा
पाशीं असावें, यासाठीं कीं जें माझें गौरव तूं मला दिलें आहे तें त्यां
पाहावें; कारण जगाच्या स्थापनेपूर्वी तूं मजवर प्रीति केली. २५
न्यायी बापा, जगानें तुला जाणिलें नाहीं, मीं तुला जाणिलें, आणि
मला पाठविलें असें ह्यांनीं जाणिलें. २६ मीं तुझें नाम त्यांस कळविं
आणि कळवीन, यासाठीं कीं जी प्रीति तूं मजवर केली ती त्यांमा
असावी आणि मीं त्यांमध्यें असावें.

१८ हें सांगितल्यावर येशू आपल्या शिष्यांसुद्धां किद्रोन ओहोळाच्
पलीकडे गेला, तेथें बाग होता, त्यांत तो व त्याचे शिष्य गे
२ ही जागा त्याला धरून देणारा यहूदा यालाही ठाऊक होती; कार
येशू आपल्या शिष्यांसहित तेथें वारंवार जात असे. ३ तेव्हां यहूद
पलटण आणि मुख्य याजक व परूशी यांपासून शिपाई मिळाल्या
फाणस, मशाली व हत्यारें घेऊन तेथें आला. ४ यास्तव येशू आपण
वर जें कांहीं येणार तें सर्व जाणून बाहेर आला आणि त्यांस ह्मणाल
तुह्मी कोणाचा शोध करितां? ५ त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, नास
थकर येशूचा. तो त्यांस म्हणाला, तो मी आहें. त्याला धरू
देणारा यहूदाही त्यांच्याबरोबर उभा होता. ६ तो मी आहें, अ
ह्मणतांच ते मागें हटून भूमीवर पडले. तेव्हां त्यानें त्यांस पुनः विच
रिलें, कोणाचा शोध करितां? ते ह्मणाले, नासरेथकर येशूचा. ८ येश
उत्तर दिलें कीं तो मी आहें असें मी तुह्मांस सांगितलें; माझा शो
करीत असलां तर यांस जाऊं द्या. ९ जे तूं मला दिले आहेस त्यांत
एकही मीं हरविला नाहीं, असें जें वचन तो बोलला तें पूर्ण व्हावें ह्मण
हें झालें. १० शिमोन पेत्राजवळ तरवार होती, ती त्यानें उपसून प्रमु
याजकाच्या दासावर चालवून त्याचा उजवा कान कापून टाकिला; त
दासाचें नांव मलूख होतें. ११ येशू पेत्राला म्हणाला, तरवार म्य
नांत घाल; बापानें जो प्याला मला दिला तो मीं पिऊं नये काय?

१२ मग पलटण व हजारांचा सरदार व यहूद्यांचे शिपाई यांनीं
शूला धरून बांधिलें, १३ आणि त्याला प्रथम हन्नाकडे नेलें, का

कयफा जो त्या वर्षी प्रमुख याजक होता त्याचा तो सासरा होता. १४ आणि एका मनुष्यानें लोकांबद्दल मरावें हें हितावह आहे अशी ज्यानें यहूद्यांस मसलत दिली तोच हा कयफा होता.

१५ शिमोन पेत्र व दुसरा एक शिष्य हे येशूच्या मागून चालले. तो शिष्य प्रमुख याजकाच्या ओळखीचा होता आणि तो येशूबरोबर प्रमुख याजकाच्या वाड्यांत गेला. १६ पेत्र दाराशीं बाहेर उभा राहिला होता यास्तव जो दुसरा शिष्य प्रमुख याजकाच्या ओळखीचा होता, त्यानें बाहेर येऊन व द्वारपालिकेला सांगून पेत्राला आंत नेलें. १७ यावरून ती तरुणी द्वारपालिका पेत्राला म्हणाली, तूंही त्या माणसाच्या शिष्यांतील आहेस ना? त्यानें झटलें, मी नाहीं. १८ तेव्हां थंडी होती म्हणून दास व शिपाई हे कोळशांचा विस्तव पेटवून शेकत उभे राहिले होते, आणि त्यांबरोबर पेत्रही उभा राहून शेकत होता.

१९ तेव्हां प्रमुख याजकानें येशूला त्याच्या शिष्यांविषयीं व त्याच्या उपदेशाविषयीं विचारिलें. २० येशूनें त्याला उत्तर दिलें कीं मीं जगाशीं उघड बोललों आहें; जेथें सभास्थानांत व देवळांत सर्व यहुदी मिळतात तेथें मी सर्वदा उपदेश केला, आणि गुप्तपणें कांहीं बोललों नाहीं. २१ मला कां विचारितोस? मी काय बोललों हें ज्यांनीं ऐकिलें आहे त्यांस विचार; पहा मी जें बोललों तें त्यांस ठाऊक आहे. २२ त्यानें असें म्हटल्यावर जवळ उभा राहणारा प्रमुख शिपाई येशूला चपडाक मारून म्हणाला, तूं प्रमुख याजकाला असें उत्तर करितोस काय? २३ येशूनें त्याला उत्तर दिलें कीं मी वाईट बोललों असलों तर त्या वाईटाविषयीं साक्ष दे, बरें बोललों असलों तर मला कां मारितोस? २४ तेव्हां हन्नानें त्याला प्रमुख याजक कयफा याकडे बांधलेलाच पाठविला.

२५ शिमोन पेत्र शेकत उभा राहिला होता. ते त्याला म्हणाले, तूंही त्याच्या शिष्यांतील आहेस ना? तो नाकारून बोलला, मी नाहीं. २६ मग ज्याचा कान पेत्रानें कापून टाकिला होता त्याचा नातलग जो प्रमुख याजकाच्या दासांतील एक होता, तो म्हणाला, मीं तुला त्याच्या बरोबर बागांत पाहिलें कीं नाहीं? २७ पेत्रानें पुनः नाकारिलें आणि तेव्हांच कोंबडा आरवला.

२८ नंतर त्यांनीं येशूला कयफाच्या येथून कचेरींत नेलें; तेव्हां सक
होती; आणि आपणांस विटाळ होऊं नये, वल्हांडणाचें भोजन करि
यावें ह्मणून ते स्वतः कचेरींत गेले नाहींत. २९ यास्तव पिलात त्यां
बाहेर येऊन म्हणाला, तुह्मी या मनुष्यावर काय आरोप आणित
३० त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, तो दुष्कर्मी नसता तर आह्मीं त्या
तुझ्या स्वाधीन केलें नसतें. ३१ पिलातानें त्यांस सांगितलें कीं, तुह्म
त्याला घेऊन आपल्या शास्त्राप्रमाणें त्याचा न्याय ठरवा. यहूदी त्या
म्हणाले, कोणाचा जीव घेण्याचा आह्मांला अधिकार नाहीं; ३२ आ
कोणत्या मरणानें मरणार हें कळवितांना येशूनें जें वचन सांगितलें ह
तें पूर्ण व्हावें ह्मणून असें झालें.

३३ यास्तव पिलात पुनः कचेरींत गेला, आणि येशूला बोला
ह्मणाला, तूं यहूद्यांचा राजा आहेस काय ? ३४ येशूनें उत्तर दिलें कीं
आपण होऊन हें ह्मणतोस, किंवा दुसऱ्यांनीं तुला मजविषयीं सांगितलें
३५ पिलातानें उत्तर दिलें, मी यहूदी आहें काय ? तुझ्याच लोकांनीं
मुख्य याजकांनीं तुला माझ्या स्वाधीन केलें. तूं काय केलेंस ?
येशूनें उत्तर दिलें कीं माझें राज्य या जगाचें नव्हे; माझें राज्य या जग
असतें तर मीं यहूद्यांच्या स्वाधीन होऊं नये ह्मणून माझ्या शिपायां
लढाई केली असती; परंतु माझें राज्य येथलें नव्हे. ३७ यावरून पिल
त्याला म्हणाला, तर तूं राजा आहेस काय ? येशूनें उत्तर दिलें कीं,
राजा आहें असें तूं ह्मणतोस. मी यासाठीं जन्मलों आहें व यासाठीं जग
आलों आहें कीं मीं सत्याविषयीं साक्ष द्यावी. जो कोणी सत्याचा आहे
माझी वाणी ऐकतो. ३८ पिलात त्याला ह्मणाला, सत्य काय आहे
असें बोलून तो पुनः यहूद्यांकडे बाहेर जाऊन त्यांस ह्मणाला, यांत म
कांहीं अपराध दिसत नाहीं. ३९ पण वल्हांडणांत मी तुह्मांसाठीं एका
सोडावें अशी तुमंची रीत आहे, ह्मणून मीं तुह्मांसाठीं यहूद्यांच्या राजा
सोडावें अशी तुमची इच्छा आहे काय ? ४० तेव्हां सर्व पुनः ओर
ह्मणाले, याला नको, तर बरब्बाला सोड. बरब्बा तर लुटारू होता.

१९ नंतर पिलातानें येशूला घेऊन फटके मारिले. २ आणि शि
यांनीं कांट्यांचा मुकुट गुंफून त्याच्या मस्तकावर घातला व जां

वस्त्र त्यास पांघरविलें; ३ आणि ते त्याकडे येऊन ह्मणाले, हे यहूद्यांच्या राजा, जयजय ! मग ते त्याला चपडाका मारूं लागले. ४ आणि पिलातानें पुनः बाहेर जाऊन त्यांस ह्मटलें, पाहा, त्यांत मला कांहीं अपराध दिसत नाहीं, हें तुह्मांस कळावें ह्मणून मी त्याला तुह्मांकडे बाहेर आणितों. ५ यास्तव येशू कांट्यांचा मुकुट व जांभळें वस्त्र घातलेला असा बाहेर आला आणि पिलात त्यास ह्मणाला, पहा हा मनुष्य ! ६ मुख्य याजक व त्यांचे शिपाई त्याला पाहून ओरडत ह्मणाले, वधस्तंभीं दे, वधस्तंभीं दे. पिलात त्यांस ह्मणाला, तुह्मींच त्याला घेऊन वधस्तंभीं द्या, कारण मला ह्याचा कांहीं अपराध दिसत नाहीं. ७ यहूद्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, आह्मांस शास्त्र आहे, आणि त्या शास्त्राप्रमाणें त्यानें मेलें पाहिजे, कारण त्यानें आपणाला देवाचा पुत्र केलें. ८ यास्तव पिलातानें हें बोलणें ऐकिलें तेव्हां तो अधिकच भ्याला. ९ आणि तो पुनः कचेरींत जाऊन येशूला ह्मणाला, तूं कोठला आहेस ? परंतु येशूनें त्याला उत्तर दिलें नाहीं. १० यास्तव पिलातानें त्याला ह्मटलें, तूं मजशीं बोलत नाहींस काय ? तुला सोडण्याचा अधिकार मला आहे, व तुला वधस्तंभीं देण्याचा अधिकार मला आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय ? ११ येशूनें उत्तर दिलें कीं, तुला वरून दिला नसता तर मजविरुद्ध तुला कांहीं अधिकार नसता; यास्तव ज्यानें मला तुझ्या स्वाधीन केलें त्याचें पाप अधिक आहे. १२ यावरून पिलात त्याला सोडण्यास झटला. परंतु यहूदी ओरडत ह्मणाले, तूं याला सोडिलें तर तूं कैसराचा मित्र नाहींस. जो कोणी आपणाला राजा करितो तो कैसराचा विरोध करितो. १३ हे शब्द ऐकून पिलातानें येशूला बाहेर आणिलें; आणि फरसबंदी नांवाची जागा जिला इब्री भाषेंत गब्बाथा ह्मणतात तेथें तो न्यायासनावर बसला. १४ तेव्हां वल्हांडणाच्या तयारीचा दिवस होता; सुमारें सहावा तास होता; तेव्हां त्यानें यहूद्यांस ह्मटलें, पाहा तुमचा राजा ! १५ यावरून ते ओरडले, ने, ने, त्याला वधस्तंभीं दे. पिलात त्यांस ह्मणाला, मीं तुमच्या राजाला वधस्तंभीं द्यावें काय ? मुख्य याजकांनीं उत्तर दिलें कीं, कैसरावांचून आह्मांस कोणी राजा नाहीं. १६ मग त्यानें त्याला वधस्तंभीं देण्याकरितां त्यांच्या स्वाधीन केलें.

१७ यास्तव त्यांनीं येशूला आपल्या ताब्यांत घेतलें; आणि तो आप
वधस्तंभ स्वतः वाहात कंवटीचें स्थान ह्मटलेल्या जागीं गेला; त्या जाग्या
इब्री भाषेंत गुलगुथा ह्मणतात. १८ तेथें त्यांनीं त्याला व त्याबरो
दुसऱ्या दोघांला वधस्तंभीं दिलें; एकाला एका बाजूस व एकाला दुस
बाजूस, आणि येशूला मध्यें. १९ आणि पिलातानें दोषपत्रकही लिहू
वधस्तंभावर लाविलें. तें, यहूद्यांचा राजा नासोरी येशू, असें लिहि
होतें. २० येशूला वधस्तंभीं दिलेलें स्थल नगराच्या जवळ हो
ह्मणून बहुत यहूद्यांनीं तें दोषपत्रक वाचिलें. तें इब्री व रोमी व
लेणी या भाषांत लिहिलें होतें. २१ यास्तव यहूद्यांचे मुख्य याज
पिलाताला ह्मणाले, यहूद्यांचा राजा असें लिहूं नको, तर मी यहूद्यां
राजा आहें असें त्यानें ह्मटलें, असें लिही. २२ पिलातानें उत्तर दि
कीं मीं जें लिहिलें तें लिहिलें.

२३ शिपायांनीं येशूला वधस्तंभीं दिल्यानंतर त्याचीं वस्त्रें घेतल
आणि एकएका शिपायाला एकएक विभाग असे चार विभाग केले, आ
अंगरखाही घेतला; त्या अंगरख्याला शिवण नव्हती, तो वरपासून खा
पर्यंत सबंध विणलेला होता. २४ यास्तव ते एकमेकांस ह्मणाले
आपण फाडूं नये, तर कोणाला येईल हें चिठ्या टाकून पाहूं. हें
साठीं झालें कीं, "त्यांनीं आपणांमध्यें माझीं वस्त्रें वांटून घेतलीं, आ
माझ्या पांघरुणावर चिठ्या टाकल्या," असा जो शास्त्रलेख तो
व्हावा. त्याप्रमाणें शिपायांनीं केलें. २५ येशूच्या वधस्तंभाजवळ त्या
आई, आणि त्याची मावशी क्लोपाची बायको मरीया, आणि मरी
मिग्दालिया, ह्या उभ्या होत्या. २६ मग येशूनें आपल्या आईला
ज्या शिष्यावर त्याची प्रीति होती त्याला जवळ उभा राहिलेला पा
आईला ह्मटलें, बाई, पहा, हा तुझा पुत्र! २७ मग त्यानें शिष्या
ह्मटलें पहा, ही तुझी आई! आणि त्या वेळेपासून त्या शिष्यानें ति
आपल्या घरांत घेतलें.

२८ यानंतर आतां सर्व पूर्ण झालें आहे हें जाणून येशूनें शास्त्रलेख
व्हावा ह्मणून मला तहान लागली आहे असें ह्मटलें. २९. तेथें आ
भरून ठेवलेलें एक भांडें होतें ह्मणून त्यांनीं आंब भरलेला स्पंज ए

बाच्या काठीवर बसवून त्याच्या तोंडाशीं लाविलें. ३० यास्तव येशूनें आंब घेतल्यानंतर, पूर्ण झालें आहे, असें म्हटलें; आणि मस्तक लववून आत्मा समर्पण केला.

३१ तो तयारीचा दिवस होता, यास्तव शब्बाथ दिवशीं शरीरें वधस्तंभावर राहूं नयेत, (कारण त्या शब्बाथाचा दिवस मोठा होता) म्हणून त्यांचे पाय मोडावे आणि त्यांस घेऊन जावें अशी यहूद्यांनीं पिलाताजवळ विनंति केली. ३२ यास्तव शिपायांनीं येऊन त्याबरोबर वधस्तंभीं दिलेल्या पहिल्याचे व दुसऱ्याचे पाय मोडिले. ३३ परंतु येशूकडे येऊन तो मरून गेला आहे असें पाहुन त्यांनीं त्याचे पाय मोडिले नाहींत. ३४ तरी शिपायांतील एकानें त्याचे कुशींत भाला भोंसकिला, तोंच रक्त व पाणी निघालें. ३५ आणि ज्यानें पाहिलें आहे त्यानें साक्ष दिली आहे; व त्याची साक्ष खरी आहे, आणि आपण खरें बोलतों हें त्याला ठाऊक आहे, यासाठीं कीं तुह्मीही विश्वास धरावा. ३६ कारण, "त्याचें हाड मोडणार नाहीं," असा जो शास्त्रलेख तो पूर्ण व्हावा म्हणून या गोष्टी घडल्या. ३७ आणि पुनः दुसराही शास्त्रलेख असें ह्मणतो कीं "ज्याला त्यांनीं भोसकिलें त्यावर ते दृष्टि लावतील"

३८ त्यानंतर अरिमाथाईकर योसफ येशूचा शिष्य, पण यहूद्यांच्या भयामुळें गुप्त शिष्य होता, त्यानें येशूचें शरीर घेऊन जाण्यास पिलाताजवळ विनंति केली, आणि पिलातानें परवानगी दिली. म्हणून त्यानें जाऊन त्याचें शरीर नेलें. ३९ आणि जो नीकदेम पहिल्यानें त्याकडे रात्रीं आला होता, तोही गंधरस व अगरु यांचें मिश्रण सुमारें शंभर शेर घेऊन आला; ४० आणि त्यांनीं येशूचें शरीर घेऊन यहूद्यांच्या उत्तरकार्याच्या रीतीप्रमाणें सुगंध द्रव्यासहित तागाच्या वस्त्रांनीं तें गुंडाळिलें. ४१ ज्या ठिकाणीं त्याला वधस्तंभीं दिलें त्या ठिकाणीं एक बाग होती, त्या बागेंत नवी कबर होती, तींत अद्यापि कोणासही ठेविलें नव्हतें. ४२ यहूद्यांच्या तयारीच्या दिवसामुळें त्यांनीं येशूला तेथें ठेविलें, कारण ती कबर जवळ होती.

२० सप्तकाच्या प्रथम दिवशीं पहांटेस अंधार असतांना मरीया मिग्दालिया कबरेजवळ आली, आणि कबरेपासून धोंड काढलेली

आहे असें तिनें पाहिलें. २ यास्तव शिमोन पेत्र व ज्यावर येशू प्रीति होती असा दुसरा शिष्य यांजवळ धांवत येऊन त्यांस म्हणाल त्यांनीं प्रभूला कबरेंतून नेलें व त्याला कोठें ठेविलें हें आम्हांस ठाऊ नाहीं.

३ यावरून पेत्र व तो दुसरा शिष्य निघून कबरेकडे चालले. तेव्हां ते दोघे बरोबर धांवले, व तो दुसरा शिष्य पेत्रापेक्षां लवकर पु धावून कबरेजवळ प्रथम पोहोंचला. ५ आणि ओणवून त्यानें तागा वस्त्रें पडलेलीं पाहिलीं. परंतु तो आंत गेला नाहीं. ६ मग शिमो पेत्रही त्याच्या मागून येऊन पोंचला आणि कबरेंत गेला, ७ आ तागाचीं वस्त्रें पडलेलीं व जो रुमाल त्याच्या डोक्याला होता तो ताग च्या वस्त्रांजवळ नाहीं तर निराळा एकीकडे घडी करून ठेविलेला आ असें त्यानें पाहिलें. ८ तेव्हां जो दुसरा शिष्य पहिल्यानें कबरेजव आला तोही आंत गेला, आणि त्यानें पाहून विश्वास धरिला. ९ कार त्यानें मेलेल्यांमधून पुन्हां उठावें हें अवश्य आहे हा शास्त्रलेख तोंपर्य ते समजले नव्हते. १० तेव्हां ते शिष्य पुनः आपल्या घरीं गेले.

११ परंतु मरीया बाहेर कबरेजवळ रडत उभी राहिली होती, आ रडतां रडतां तिनें ओणवून कबरेंत पाहिलें; १२ तों जेथें येशूचें शर ठेविलें होतें तेथें शुभ्र वस्त्रें परिधान केलेले दोन दूत एक उशाजवळ एक पायथ्याजवळ असे बसलेले तिनें पाहिले. १३ ते तिला म्हणा बाई, कां रडतेस? ती त्यांस ह्मणाली, त्यांनीं माझ्या प्रभूला नेलें, त्याला कोठें ठेविलें हें मला ठाऊक नाहीं म्हणून. १४ असें बोलून पाठमोरी फिरली, तों तिनें येशू उभा राहिलेला पाहिला, परंतु तो ये आहे असें तिला समजलें नाहीं. १५ येशूनें तिला म्हटलें, बाई रडतेस? कोणाचा शोध करतेस? तो बागवान आहे असें समज ती त्याला ह्मणाली, महाराज, तूं त्याला येथून नेलें असलें तर त्या कोठें ठेविलें हें मला सांग, ह्मणजे मी त्याला घेऊन जाईन. १६ येशू तिला म्हटलें, मरीये. ती वळून त्याला इब्री भाषेंत म्हणाली, रब्बूनी ह्मणजे हे गुरू. १७ येशूनें तिला म्हटलें मला शिवूं नको, कारण अद्यापि बापाजवळ वर गेलों नाहीं; तर माझ्या भावांकडे जाऊ

त्यांस सांग कीं, जो माझा बाप व तुमचा बाप, आणि माझा देव व तुमचा देव, त्याजवळ मी वर जातों. १८ मरीया मिग्दालीयेनें जाऊन मीं प्रभूला पाहिलें व त्यानें मला या गोष्टी सांगितल्या, हें वर्तमान शिष्यांस कळविलें.

१९ त्याच दिवशीं ह्मणजे सप्तकाच्या पहिल्या दिवशीं संध्याकाळ झाल्यावर, जेथें शिष्य होते तेथील दारें यहूद्यांच्या भयामुळें बंद असतां, येशू आला व मध्यें उभा राहून त्यांस म्हणाला, तुह्मांस शांति असो. २० असें बोलून त्यानें आपले हात व कूस त्यांस दाखविली; तेव्हां शिष्य प्रभूला पाहून आनंद पावले. २१ येशू पुनः त्यांस म्हणाला, तुम्हांस शांति असो; जसें बापानें मला पाठविलें आहे तसें मींही तुह्मांस पाठवितों. २२ असें बोलून त्यानें त्यांवर श्वास टाकला, आणि त्यांस ह्मटलें, पवित्र आत्मा घ्या; २३ ज्या कोणाच्या पापांची तुह्मीं क्षमा करितां त्यांची क्षमा झाली आहे, आणि ज्या कोणाची तुह्मीं राखतां तीं राखलेलीं आहेत.

२४ येशू आला तेव्हां बारांतील एक, दिदुम ह्मटलेला थोमा हा त्यांच्याबरोबर नव्हता. २५ यास्तव दुसऱ्या शिष्यांनीं त्याला सांगितलें, आह्मीं प्रभूला पाहिलें. तरी त्यानें त्यांस ह्मटलें, त्याच्या हातांत खिळ्याचा वण पाहिल्यावांचून व खिळ्याच्या वणांत मी आपलें बोट घातल्यावांचून व त्याच्या कुशींत आपला हात घातल्यावांचून मी विश्वास धरणारच नाहीं.

२६ मग आठ दिवसांनंतर त्याचे शिष्य पुनः आंत होते, व त्यांच्या बरोबर थोमा होता. दारें बंद असतां येशू आला व मध्यें उभा राहून म्हणाला, तुम्हांस शांति असो. २७ नंतर त्यानें थोमाला म्हटलें, तूं आपलें बोट इकडे करून माझे हात पाहा, आणि आपला हात इकडे पुढें करून माझ्या कुशींत घाल; आणि अविश्वासी होऊं नको, तर विश्वासी ऐस. २८ थोमानें त्याला म्हटलें, माझा प्रभु व माझा देव. २९ येशूनें त्याला म्हटलें, तूं मला पाहिलें आहे म्हणून विश्वास धरिला आहे; पाहिल्यावांचून विश्वास धरणारे ते धन्य.

३० या पुस्तकांत लिहिलीं नाहींत अशीं बहुत दुसरींही अद्भुतें येशू
आपल्या शिष्यांदेखतां केलीं; ३१ येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त अ
असा तुह्मीं विश्वास धरावा; आणि विश्वास धरून तुह्मीं त्याच्या नांव
जीवन पावावें म्हणून हीं लिहिलीं आहेत.

२१ त्यानंतर तिबिर्येच्या समुद्राजवळ येशू शिष्यांस पुनः प्रगट झाल
आणि तो या प्रकारें प्रगट झाला. २ शिमोन पेत्र व दिदु
ह्मटलेला थोमा व गालीलांतील काना येथचा नथनेल व जब्दीचे पुत्र
त्याच्या शिष्यांतील दुसरे दोघे हे एकत्र असतां, ३ शिमोन पेत्रानें त्य
म्हटलें, मीं मासे धरावयास जातों. ते त्याला म्हणाले, आम्हीं
तुझ्याबरोबर येतों. तेव्हां ते निघून मचव्यांत बसले, आणि त्या रा
त्यांनीं कांही धरिलें नाहीं. ४ आणि पहांट होत असतां येशू समुद्रा
तीरीं उभा राहिला, तथापि तो येशू आहे असें शिष्यांस समजलें ना
५ म्हणून येशूनें त्यांस म्हटलें, मुलांनो, तुम्हांस कांहीं खायाला अ
काय? नाहीं असें त्यांनीं त्याला उत्तर दिलें, ६ त्यानें त्यांस म्हट
मचव्याच्या उजव्या बाजूस जालें टाका म्हणजे तुह्मांस सांपडेल.
णून त्यांनीं टाकिलें, तेव्हां माशांच्या घोळक्यामुळें तें त्यांस ओढवे
७ यावरून ज्या शिष्यावर येशूची प्रीति होती तो पेत्राला म्हणा
प्रभु आहे, प्रभु आहे. हें ऐकून शिमोन पेत्रानें अंगरखा घालून
कमरेशीं गुंडाळिला (कारण तो उघडा होता) आणि समुद्रांत
टाकिली. ८ दुसरे शिष्य तर माशांचें जालें ओढीत ओढीत होडी
आले, कारण ते कांठापासून दूर नव्हते, तर सुमारें दोनशें हात
होते. ९ मग कांठीं उतरले तों त्यांनीं कोळशांचा विस्तव व त्या
घातलेली मासळी आणि भाकर पाहिली. १० येशूनें त्यांस ह्म
तुह्मी आतां धरलेल्या माशांतून कांहीं आणा. ११ यास्तव शिम
पेत्रानें मचव्यावर चढून एकशें त्रेपन्न मोठ्या माशांनीं भरलेलें ज
कांठीं ओढिलें; तितके असतांही जालें फाटलें नाहीं. १२ येशू त्य
म्हणाला, या, जेवा. तेव्हां तो प्रभु आहे असें त्यांस समजलें, म्ह
तूं कोण आहेस हें त्याला पुसायास शिष्यांतील कोणी धजला ना
१३ येशूनें येऊन भाकर घेतली व त्यांस दिली, तशीच मासळीही दि

१४ येशू मेलेल्यांतून उठल्यावर आपल्या शिष्यांस प्रगट झाल्याची ही तिसरी वेळ.

१५ ते जेवल्यानंतर येशूनें शिमोन पेत्राला ह्मटलें, योहानाच्या पुत्रा शिमोना, यांपेक्षां तूं मजवर अधिक प्रीति करितोस काय? तो त्याला म्हणाला, होय प्रभु, मी तुजवर प्रेम करितों, हें तुला ठाऊक आहे. त्यानें त्याला म्हटलें, माझीं कोंकरें चार. १६ पुनः दुसऱ्यानें तो त्याला ह्मणाला, योहानाच्या पुत्र शिमोना, मजवर प्रीति करितोस काय? तो त्याला म्हणाला, होय प्रभु, मी तुजवर प्रेम करितों, हें तुला ठाऊक आहे. त्यानें त्याला ह्मटलें, माझीं मेंढरें पाळ. १७ तिसऱ्यानें तो त्याला ह्मणाला, योहानाच्या पुत्रा शिमोना, मजवर प्रेम करितोस काय? मजवर प्रेम करितोस काय असें तिसऱ्यानें त्याला ह्मटलें, म्हणून पेत्र दुःखी होऊन त्याला ह्मणाला, हे प्रभू, तुला सर्व ठाऊक आहे, मी तुजवर प्रेम करितों हें तूं जाणतोस. येशूनें त्याला ह्मटलें, माझीं मेंढरें चार. १८ मी तुला खचीत खचीत सांगतों, तूं तरुण होतास तेव्हां स्वतः कमर बांधून तुझ्या इच्छेस येई तेथें जास. परंतु तूं ह्मातारा होशील तेव्हां तूं हात लांब करशील आणि दुसरा तुझी कंबर बांधून तुझ्या इच्छेस येणार नाहीं तेथें तुला नेईल. १९ तो कोणत्या प्रकारच्या मरणानें देवाचें गौरव करील हें सुचवीत बोलला. आणि असें बोलून तो त्याला ह्मणाला, माझ्या मागून ये. २० मग पेत्रानें वळून ज्या शिष्यावर येशूची प्रीति होती आणि जो भोजनाच्या वेळेस त्याच्या उराशीं टेंकलेला असतां मागें लवून हे प्रभू, तुला धरून देणारा तो कोण आहे? असें ह्मणाला, त्याला मागून चालतांना पाहिलें. २१ त्याला पाहून पेत्र येशूला ह्मणाला, हे प्रभु याचें काय? २२ येशूनें त्याला ह्मटलें, मी येई तोंपर्यंत त्यानें राहावें अशी माझी इच्छा असली तर ह्याचें तुला काय? तूं माझ्या मागून ये. २३ यावरून तो शिष्य मरणार नाहीं, अशी गोष्ट भावांमध्यें पसरली, तरी येशूनें तो मरणार नाहीं असें त्याला ह्मटलें नव्हतें, तर मी येई तोंपर्यंत त्यानें राहावें अशी माझी इच्छा असली तर ह्याचें तुला काय?

२४ जो शिष्य या गोष्टींविषयीं साक्ष देतो व ज्यानें या ग
लिहिल्या तोच हा आहे, आणि त्याची साक्ष खरी आहे हें आह्मी जाण

२५ येशूनें केलेलीं दुसरींही बहुत कृत्यें आहेत, तीं सर्व ए
लिहिलीं तर लिहिलेलीं पुस्तकें या जगांत मावणार नाहींत, असें
वाटतें.

Published by British & Foreign Bible Society,
Hornby Road, Bombay.
Printed by G. N. Kulkarni, at the Karnatak Printing Press
434, Thakurdwar, Bombay.

पवित्र शास्त्र आणि त्याचे कांहीं भाग यांची किंमत.

रु. आ. पै.

पवित्रशास्त्र	०-१२-०
नवा करार	०—३—०
मत्तयकृत शुभवर्त्तमान	०—०—३
मार्ककृत शुभवर्त्तमान	०—०—३
लूककृत शुभवर्त्तमान	०—०—३
योहानकृत शुभवर्त्तमान	०—०—३
नीति	०—०—३
गीतांचें पुस्तक	०—१—०

हीं पुस्तकें खालीं दिलेल्या पत्त्यावर विकत मिळतील:—

सेक्रेटरी,—**बैबलसोसायटी,**

हॉर्नबी रोड—**मुंबई.**